जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## बाटलीबंद पाणी.. गरज पण सुरक्षित?

पाण्याचं महत्त्व खूप काही आहे. तिसरं महायुद्ध किंवा अवनीचं अस्तित्व, नष्टता सर्वकाही पाण्यावरच अवलंबून आहे.

कधी गरज तर कधी चैन म्हणून, कधी प्रतिष्ठा तर कधी आरोग्याची काळजी म्हणून बाटलीबंद पाणी बहुतेक सगळीकडे वापरले जाते. बाटलीतलं पाणी विकत घेणाऱ्यांच्या मनात आपण स्वच्छ व शुद्ध पाणी पित आहोत याबाबत समाधान असते. प्रत्यक्षात हॉटेल्स, लग्नसमारंभ व बऱ्याच ठिकाणी हे बाटलीबंद पाणी प्रमाणित व शुद्ध असेलच असे नाही. किंबहुना अनेक पाहण्यांमधून मिनरल वॉटर म्हणून विकले जाणारे हे बाटलीबंद पाणी आरोग्यासाठी घातक असल्याचे दिसून आले आहे.

आता भारतीय अन्नसुरक्षा व मानक प्राधिकरणाने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटरचे वर्गीकरण अतिधोकादायक खाद्यपदार्थांच्या श्रेणीत केल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

या बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेसह त्या प्लॅस्टीकच्या कचऱ्याची विल्हेवाट हासुद्धा फार गंभीर अन् मोठाच प्रश्न आहे. आता तर मायक्रो–नॅनो प्लास्टीकचा धोका वाढत चाललाय. बाटलीबंद पाण्यात १०० पट जास्त प्लास्टीकचे कण असू शकतात.

मी काय म्हणतो, हॉटेल, छोट्यामोठ्या समारंभ व प्रवासात स्वतःच्या घरातले पाणी न्यायला काय हरकत? पैशांसह आरोग्याचीही बचत!



# ‘नेप्ती उपबाजार समिती’तील मुरुम उत्खनन प्रकरणी चेअरमन, व्हा.चेअरमनसह सचिवांवर गुन्हा दाखल करा

## अमोल येवले यांची तहसीलदार संजय शिंदे यांना निवेदन देत मागणी

नगर – नेप्ती उपबाजार समितीच्या ७ एकर जागेमधून मोठ्या प्रमाणात दोन तीन महिन्यांपासून मुरुमाचे उत्खनन चालू आहे, वीस वीस फुटाचे खड्डे पडले आहे. वेळोवेळी तहसीलदार यांना निवेदन देखील दिले आहे उत्खनन करणाऱ्या टोळीचा म्होरक्या पुण्यातून हे काम करत आहे, त्यातीलच एक म्होरक्या जामिनावर बाहेर असून त्याच्या नेतृत्त्वाखाली ही टोळी केडगावमध्ये काम करत आहे. तरी तहसीलदार संजय शिंदे यांनी या जागेचा पंचनामा करून मार्केट कमिटीचे संचालक मंडळ, सचिव, यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी माजी नगरसेवक अमोल येवले यांनी निवेदनातून केली. यावेळी शरद ठुबे, सोनू घेंबुड, विजय सुंबे, अभिजीत कोतकर, दत्ता धोत्रे, तुकाराम कोतकर, मल्हारी आव्हाड, ओंकार कापडे, सुहास साबळे, संकेत वाघमारे, राहुल शिंदे, गणेश दिवटे, कार्तिक पितळे आदी उपस्थित होते


नेप्ती उपबाजार समितीतील मुरुम उत्खनन प्रकरणी चेअरमन, व्हा.चेअरमनसह सचिवांवर गुन्हा दाखल करा अशा मागणीचे निवेदन तहसीलदार संजय शिंदे यांना देताना अमोल येवले आदी.

निवेदनात म्हटले की, अहिल्यानगर येथील नेप्ती उपबाजार समिती मधुन अवैध रित्या मुरमाचे उत्खनन झाले असुन सदर मुरुम इतर ठिकाणी वापरण्यात आला आहे. गौणखनिज वाहतुक झाली असुन त्यासाठी कुठल्याही प्रकारची रॉयल्टी (स्वामित्व धन) न भरता बांधकाम व रस्त्यांसाठी गौणखनिजाचा वापर झाला आहे. त्याचप्रमाणे शासनाची फार मोठ्या प्रमाणात स्वामित्व धन (रॉयल्टी) चे नुकसान केले असुन झालेल्या उत्खननामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आहे. सदर वाहतुकीमुळे रस्त्यांची चाळण झाली असून त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना मणक्याचा त्रास व हाडांच्या समस्या जाणवत आहेत. नेप्ती, ता.नगर, जि. अहिल्यानगर येथील नेप्ती उपबाजार समिती यांचे नावावर असुन सात बारा वर तशी नोंद आहे. त्यामुळे सदर उत्खननास नेप्ती उपबाजार समिती सुध्दा जबाबदार असुन समितीच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन, सभापती, सचिव यांचेवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत, सदर उत्खननाचा महसुल यंत्रणे मार्फत पंचनामा करण्यात येऊन त्याबाबत व्याज व दंडासह वसुली करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

## अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

नगर – नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद शिवारात अंदाजे ५० वर्षे वयाच्या अनोळखी पुरुषाचा मृतदेह डिकंपोज अवस्थेत २३ ऑक्टोबर २०२४ रोजी आढळलेला आहे. या मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नसून नातेवाईकांचा शोधही लागलेला नाही. त्यामुळे पोलिसांनी नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी सहाय्य करण्याचे आवाहन केले आहे.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे ५० वर्षे असून अंगावर चौकडा शर्ट, काळी पॅन्ट आहे. त्याच्या उजव्या हाताच्या कांबीवर इंग्रजीत ठच गोंदलेले आहे. रंग सावळा असून उंची ५ फूट ६ इंच आहे.

मयत व्यक्तीचे नाव, गाव व नातेवाईक याबाबत कोणालाही माहिती असल्यास नगर तालुका पोलीस स्टेशनला स.पो.नि. प्रल्हाद गिते मो. ९८२३४४११५८, पो.हे.कॉं. राहुल द्वारके मो. ९२७२७६२७४१ किंवा पोलीस ठाणे: ०२४१–२४१६१२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

### ओळख पटवण्याचे नागरिकांना आवाहन

नगर – जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारात आजारी अवस्थेत आढळून आलेल्या ४० वर्षीय अनोळखी इसमास उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले असता त्याचा औषधोपचार दरम्यान त्याचा ११ जानेवारीला मृत्यू झाला आहे.

या प्रकरणी जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ वाघ यांनी दिलेल्या अहवालानुसार तोफखाना पोलिस ठाण्यात बी एन एस एस १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. असून अधिक तपास पोलिस हवालदार आंधळे करीत आहेत.

मयत पुरुषाचे वय अंदाजे ४० वर्षे, शरीरबांधा सडपातळ, उंची ५ फूट ५ इंच, रंग सावळा, चेहरा उभट, अंगात गर्द निळे रंगाचा हाफ बाह्याचा शर्ट, काळी पॅन्ट असे आहे.

या वर्णनाच्या इसमास कोणी ओळखत असेल तर त्यांनी तोफखाना पोलीस ठाणे फोन नंबर ०२४१ २४१६११८ या फोनवर संपर्क करावा, असे आवाहन तोफखाना पोलिसांनी केले आहे.

# जिल्ह्यातील गरजू व पात्र महिलांना पिंक ई-रिक्षाचा लाभ द्या

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे निर्देश

नगर – जिल्ह्यातील महिलांना रोजगार उपलब्ध होण्याच्यादृष्टीने अधिकाधिक गरजू व पात्र महिला लाभार्थ्यांना पिंक (गुलाबी) ई–रिक्षाचा लाभ देण्यात यावा. आपला जिल्हा या योजनेमध्ये अग्रेसर राहील यादृष्टीने योजनेची अंमलबजावणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले.


जिल्हाधिकारी कार्यालयात पिंक (गुलाबी) ई–रिक्षा योजनेबाबत आयोजित आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

जिल्हाधिकारी कार्यालयात पिंक (गुलाबी) ई–रिक्षा योजनेबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नारायण कराळे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे संजय गर्जे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, महिलांना, मुलींना रोजगार निर्मितीस चालना देऊन, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, त्यांना आत्मनिर्भर करणे, तसेच महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करण्यासाठी ही योजना लाभदायी आहे. पिंक (गुलाबी) ई–रिक्षाचा लाभ घेतल्यानंतर महिलांना स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी इतर कोणावरही अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

शासनाकडून ई–रिक्षांच्या एकूण किंमतीवर सर्व करांसह २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. ७० टक्के रक्कम कर्ज स्वरूपात बँकेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार असून उर्वरित १० टक्के रक्कम संबंधित महिलेला लाभार्थी हिस्सा म्हणून गुंतवावी लागणार आहे. महिलांनी मोठ्या संख्येने या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी श्री.सालीमठ यांनी यावेळी केले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नारायण कराळे म्हणाले, योजनेच्या लाभासाठी महिला महाराष्ट्राची मूळ रहिवासी असणे आणि वय २१ वर्ष ते ४० वर्षे दरम्यान असणे आवश्यक आहे. महिलेचे कुटुंबिक वार्षिक उत्पन्न दोन लाखापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. पिंक ई–रिक्षा या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांच्या कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी नोकरीमध्ये काम करत नसावा. आधार कार्ड, बँक खाते पासबुक, पासपोर्ट आकाराचा फोटो, शाळा सोडलेला दाखला, पॅनकार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड, हमीपत्रासह अर्ज सादर करावा, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

बैठकीस संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## वर्धमान प्लायवूडचे संचालक योगेश (गुड्डू) मुनोत यांचे निधन



नगर – येथील वर्धमान प्लायवूडचे संचालक योगेश (गुड्डू) सुरेश मुनोत (वय ५०) यांचे १५ जानेवारी रोजी पहाटे पुणे येथील खाजगी रूग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, बंधू शैलेश मुनोत, १ मुलगा रितिक मुनोत, १ मुलगी, सून असा मोठा परिवार आहे. योगेश मुनोत अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे व धार्मिक वृत्तीचे होते. राज व रौनक मुनोत यांचे ते काका होते. नवी पेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळासह विविध सामाजिक संस्थांच्या सामाजिक कार्यात ते सातत्याने योगदान देत. त्यांच्यावर बुधवारी सायंकाळी नगरमध्ये अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## लिलाबाई ठोकळ यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील लिलाबाई निवृत्ती ठोकळ (वय ७९, रा.वांगदरी, ता.श्रीगोंदा) यांचे १५ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर घोडनदी वांगदरी (ता.श्रीगोंदा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अविनाश, सुभाष, विठ्ठल, हेमलता ठोकळ यांच्या त्या मातोश्री होत.

# अहिल्यानगर शहरातील महिलांना रोजगारासाठी मिळणार पिंक ई रिक्षा

### शहरातील इच्छुक महिलांना अर्ज भरण्यासाठी महानगरपालिकेत सुविधा उपलब्ध



नगर – शहरातील गरजू महिलांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने महिला व बाल विकास विभागामार्फत पिंक ई रिक्षा योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. महिलांना रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना वाहन चालवण्याचा परवाना व प्रवासी वाहतुकीचा परवानगी दिला जाणार आहे. रिक्षाच्या किंमतीच्या दहा टक्के रक्कम भरून ही रिक्षा उपलब्ध करून दिली जाणार आहे. इच्छुक गरजू महिलांनी पिंक ई रिक्षासाठी महापालिकेत अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेत राज्य शासनाने पिंक ई रिक्षा योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिलांना रिक्षाच्या किंमतीच्या अवघ्या १० टक्के रकमेत ही रिक्षा उपलब्ध होणार आहे. उर्वरित रकमेतील ७० टक्के रक्कम बँकांकडून कर्ज स्वरूपात व २० टक्के रक्कम शासन अनुदान स्वरूपात देणार आहे. पात्र महिलांना रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षण देऊन वाहन चालवण्याचा परवाना, प्रवासी वाहतूक परवाना उपलब्ध करून दिला जाणार आहे.

अहिल्यानगर शहरात ३०० महिलांना रोजगारासाठी रिक्षा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. इच्छुक महिलांना अर्ज करण्यासाठी महानगरपालिकेत सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाशेजारी असलेल्या संकुलातील डे एनयुएलएम विभागाच्या कार्यालयात अर्ज उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घेऊन अर्ज करावेत, अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी ९७३०७३८५५७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

## महापुरुषांच्या पुतळ्यांचे अनावरण २६ जानेवारीपर्यंत करा अन्यथा महानगरपालिकेसमोर ‘आमरण उपोषण’ करणार


पत्रकार परिषदेत बोलताना बहुजन आंबेडकरवादी चळवळीचे प्रणेते अशोक गायकवाड आदी.

नगर – महाराष्ट्रातील परभणी व मस्साजोग येथील दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी तसेच सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तीव्र निषेध करून मारेकऱ्यांना कठोर शासन करण्याची मागणी करण्यात आली असून अहिल्यानगर शहरात स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे पुतळ्याचे अनावरण लवकरात लवकर करण्यात यावे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा जो पुण्याच्या शिल्पकाराच्या गोडाऊनमध्ये बंदिस्त आहे. त्यास मुक्त करून २६ जानेवारीपर्यंत पुतळ्याचे ऐतिहासिक अनावरण नगर शहरात करून आंबेडकरी जनतेचे स्वप्न साकार करावे. नगर शहरातील मार्केट यार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती पुतळ्याचे योग्य जागी स्थलांतर करावे व पुतळ्याचे पावित्र्य राखावे तसेच नगर शहरातील टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची पूर्ण बांधणी नव्याने करून सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका, व्यायाम शाळा, जिम याची निर्मिती करावी तसेच प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत अल्पसंख्यांक विभाग भारत सरकार यांच्या योजनेतून महापालिकेने त्यांचे मौजे पिंपळगाव माळवी येथील तलावानजीक १० एकर जागेत मेडिटेशन हॉल बांधावा नगर शहरातील सामाजिक न्याय भवन सावेडी येथील जागेची संरक्षण भिंत बांधून प्रवेशद्वारासाठी उपलब्ध निधीचा वापर करून जनतेची देखणी वास्तु सुरक्षित करावी आदी मागण्या आंबेडकरी चळवळीचे नेते अशोक गायकवाड यांनी केली आहे.

यावेळी बहुजन आंबेडकरवादी चळवळीचे प्रणेते अशोक गायकवाड, चर्मकार संघर्ष समितीचे शिवाजीराव साळवे, विजय भांबळ, बौद्धचार्य दीपक अमृत, अमित काळे, प्रा.भीमराव पगारे, विनोद भिंगारदिवे, नितीन कसबेकर, कैलास पगारे, दया गजभिये, यशवंत भांबळ, ॲड. आनंद सूर्यवंशी, शैनेश्वर पवार, प्रवीण चाबुकस्वार, उत्तमराव साठे, चंद्रकांत भिंगारदिवे, आदित्य भांबळ, सदाशिव भिंगारदिवे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## शकुंतला घोडके यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – मोरे गल्ली, वांबोरी येथील रहिवासी शंकुतला प्रभाकर घोडके (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन. त्या अत्यंत मनमिळाऊ आणि धार्मिक प्रवृतीच्या होत्या. त्यांच्या मागे पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातू, पणतू, जावई असा परिवार आहे. निवृत्त पोलिस उपनिरीक्षक श्रीनिवास घोडके व वांबोरी येथील जान्हवी ऑप्टिकलचे संचालक महेंद्र घोडके यांच्या त्या मातोश्री जिल्हा परिषदेचे सेवानिवृत केंद्रप्रमुख प्रभाकर घोडके यांच्या पत्नी होत.

## उमाकांत लोळगे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील सोनार लेन येथील पूजा अलंकार गृह व धान्य गल्ली येथील निलेश अलंकार गृहचे मालक उमाकांत काशिनाथ लोळगे (वय ५८) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. रमाकांत लोळगे यांचे थोरले बंधू, निलेश, मंगेश व गणेश लोळगे यांचे वडील, चि. योगेश रमाकांत लोळगे यांचे चुलते होत.

## बिबट्यांची नसबंदी

(पान १ वरुन)

आ. सत्यजीत तांबे यांनी हिवाळी अधिवेशनात केली होती.

### आ. तांबेंनी केंद्रीय वन मंत्र्यांची घेतली होती भेट

राज्यातील अनेक वनक्षेत्रामध्ये बिबट्यांचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनलेला आहे. याच संदर्भात आ. सत्यजीत तांबेंनी जून २०२४ मध्ये केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेतली होती. या भेटीत केंद्र शासनाने बिबट्यांची नसबंदी करण्याची परवानगी देण्याची मागणी आ. तांबेंनी केली होती. परंतु, राज्य शासनाने याबाबतचा प्रस्ताव पाठविल्यास केंद्र शासन त्याबाबतचा सकारात्मक विचार करून मंजुरी देण्यात येईल असे सांगण्यात आले होते.

### वर्षभरात १३ वाघांचा मृत्यू

मार्च २०२३ ते मार्च २०२४ मध्ये २६ वाघ आणि बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. मार्च २०२४ पासून आतापर्यंत १३ वाघ व बिबट्या मृतावस्थेत आढळले. कधी शिकार करून तर कधी विजेच्या तारा, दोन जनावरांमधील झुंजीमुळेही मृत्यू झाले आहेत.

## पतंग उडविण्याच्या वादातून हाणामारी; ४ जखमी, ९ जणांवर गुन्हा

नगर – मकरसंक्रांतीच्या दिवशी गाणे वाजवण्यावरून व पतंग उडविण्याच्या वादातून निलक्रांती चौक परिसरात काही युवकांमध्ये हाणामारी झाली. यावेळी दोन्ही बाजूने जमाव जमला होता. किरकोळ दगडफेकही झाली. यात ४ जण जखमी झाले असून, परस्परविरोधी फिर्यादीवरून दोन्ही गटाच्या ९ जणांवर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मंगळवारी दुपारी तीन ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास निलक्रांती चौकातून बालिकाश्रम रस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही युवकांमध्ये पतंग उडविण्याच्या वादातून व गाणे लावल्यावरून वाद झाले. झटापट होऊन हाणामारी झाली. यात ४ जण जखमी झाले आहेत. तोफखाना पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जमावाला पांगवले. त्यानंतर काही वेळातच चौकाच्या दुसऱ्या बाजूने किरकोळ दगड फेकण्यात आले. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, याप्रकरणी संकेत सुनिल पारधे (वय २०, रा. निलक्रांती चौक बालिकाश्रम शाळेचे समोर बालिकाश्रम रोड) याने दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, आपण इतर सहकाऱ्यासह आपल्या आत्याच्या घराच्या गच्चीवर साऊंड लावून नाचत पतंग उडवत होतो. तेव्हा निलक्रांती चौकासमोर मंदिराचे जवळ निखील अजय साळवे, रवीराज अजय साळवे, राहुल अजय साळवे, अनिकेत अनिल साळवे, तुषार भोसले, यश मकासरे (सर्व रा. निलक्रांती चौक) यानी पतंग उडवीत असताना यापुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरून आपली आत्या सुनिता कांबळे यांच्या घराच्या दिशेने रागात दगडफेक केली. त्यातील एक दगड आपल्या पाठीत लागल्याने इतर मुले पळून गेली.

त्यानंतर आपण घरी जात असताना पाच ते सहा जणांनी रस्त्यात थांबवून आमच्याकडे पाहून का नाचत होतास आम्हाला खुन्नस का देत होता, असे बोलून शिवीगाळ केली. तेव्हा त्यांना समजावून सांगत असताना त्यांनी लाथाबुक्क्याने हाताने चापटीने मारहाण केली. तसेच निखील साळवे याने हातातील तलवारीसारखे धारदार हत्याराने डाव्या दंडाचे पाठीमागे मारहाण केली. मारहाण करत असताना तेथे निखील लोणारे व इतर लोक जमा झाले, तेव्हा मारहाण करणारे तेथून पळून गेले. लोकांनी आपणास उपचाराकरिता हॉस्पीटलमध्ये दाखल केले.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी निखील साळवे, रवीराज साळवे, राहुल साळवे, अनिकेत साळवे, तुषार भोसले, यश मकासरे यांचेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी फिर्याद अनिकेत अनिल साळवे (वय २३, रा.गौतमनगर निलक्रांती चौक) याने दिली आहे. त्यात म्हटले आहे की, मंगळवारी दुपारी आपण व तुषार भोसले गौतम नगर येथील समाज मंदीर येथे बसलेलो असताना त्यावेळी अंकुश अनिल कांबळे व आकाश अनिल कांबळे हे आरडाओरडा करुन शिवीगाळ करत होते. तेव्हा ते दोघे तेथे काय झाले, हे पाहण्यासाठी गेले असता अंकुश कांबळे याचे हातात लोखंडी कोयता व आकाश कांबळे याचे हातात लाकडी दांडके होते. दोघांनी काही कारण नसतांना शिवीगाळ करुन दगड फेकून मारले. तो दगड अनिकेत याच्या डोक्याला लागला. त्याचवेळी अंकुश कांबळे यांने लोंखडी कोयता उजवे हाताला मारला व आकाश कांबळे यांने लाकडी दांडक्याने तुषार भोसले याचे डोक्यात मारल्याने दोघेही जखमी झाले. त्यांनी दोघांना शिवीगाळ करुन आमच्याविरुध्द केस केल्यास तुम्हाला मारुन टाकू, अशी धमकी दिली. त्यानंतर तुषार दादासाहेब बोराडे याला सुध्दा कुणाल कांबळे, आकाश कांबळे व अंकुश कांबळे यांनी मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अंकुश कांबळे, आकाश कांबळे, कुणाल उर्फ सनी कांबळे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर जंकफूड ठरेल हानीकारक

गरोदरपणात जंक फूडमुळे आवश्यक पोषक तत्वांची कमतरता होऊ शकते, ज्यामुळे आई आणि बाळाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्या ऐवजी ताजी फळे आणि सुकामेवा यांच्यावर भर द्यावा. यामध्ये जीवनसत्त्वे व खनिजे मोठ्या प्रमाणात असतात.

## पाककला

### रसमंजिरी

**साहित्य :** दोन लिटर दूध, अर्धी वाटी खवा, एक वाटी साखर, पाव वाटी शेवया, तवकील, बदामाचे काप, रंग किंवा केशर, तूप.

**कृती :** सुपारीएवढ्या आकाराचे गुलाबजाम करावेत. एक वाटी साखरेच्या पाकात ते मुरण्यास ठेवावेत.

शेवया बदामी रंग येईतो तुपावर परतून घेऊन, त्यांवर लगेच पाणी घालून, त्या निथळत ठेवाव्या. दूध आटवून निम्मे करावे. ते थोडे थंड झाल्यावर पाकासकट गुलाबजाम, शेवया, रंग वा केशर व बदामाचे काप घालून हलक्या हाताने ढवळावे व एक उकळी आणावी.

## वास्तू

### बँक स्टाफची बैठक व्यवस्था

मुख्यतः आग्नेय अथवा वायव्य दिशेत स्टाफची बैठक व्यवस्था असावी. सर्व स्टाफचे तोंड, मुख्य कॅश ड्रॉवर्स तसेच लॉकर्स पूर्व ते उत्तर दिशाभिमुख असावे. जुन्या फाईल्स, रेकॉर्ड्स दक्षिण ते नैऋत्य भागात करावे. कर्ज वसुली विभाग प्रामुख्याने आग्नेय दिशेतच असावा.

## सल्ला

कार्यालयाच्या भिंतींना पिवळा, क्रीम किंवा ऑफ व्हाईट रंगांना प्राधान्य द्यावे.

## सौंदर्य

डोळे तपकिरी किंवा घारे असतील, तर ब्राउन लायनर किंवा कलरफुल लायनर लावावे. डोळे काळे असतील, तर काळे लायनर लावावे.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १६ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, आश्लेषा ११।१७, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक क्षेत्रात अनुसंधान संबंधी योग. मित्रांचा सहयोग मिळेल. मनोबल वाढेल.

**वृषभ :** घरातील वातावरणामुळे मन प्रसन्न राहील. मनोबल वाढेल. व्यापार क्षेत्रात लाभ. सुखद वातावरण राहील.

**मिथुन :** घरातील व्यक्तिशी वाद होऊ शकतो. खर्च वाढतील.

**कर्क :** आरोग्याकडे लक्ष द्या. उधारी, उसनवारी वसूल होईल. व्यवसायात वाढ होईल.

**सिंह :** घरासाठी मौल्यवान वस्तू खरेदी कराल. आकस्मिक लाभ. प्रियजनांची भेट. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील.

**कन्या :** आध्यात्मिक क्षेत्रात मनाची एकाग्रता साधता येईल. आध्यात्मिक चेतना मिळेल. एखादी चांगली संधी लाभेल.

**तूळ :** चांगल्या घटना घडतील. कामात यश. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील.

**वृश्चिक :** स्वप्ने पूर्ण होतील. अविवाहितांसाठी लग्नाचे प्रस्ताव. लांबलेल्या प्रकरणात यश.

**धनु :** विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. कला, संगीत, नाट्य क्षेत्रात सुसंधी मिळेल.

**मकर :** कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल. खर्चाचे प्रमाण कमी होईल.

**कुंभ :** तणाव अडचणी राहतील. खर्च वाढतील. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल.

**मीन :** अध्ययनात छान यश. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### शिक्षा

कॉन्व्हेंट शाळेतील दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने वर्गातील एका मुलीला प्रेमपत्र लिहिले. त्या मुलीने वर्गशिक्षकाकडे तक्रार केली.

शिक्षकांनी मुलाला बोलावून फैलावर घेतले आणि दहा रुपये दंड करून दम भरला, ''परत पत्र हिंदीत लिहिशील तर बघ! नेहमी इंग्रजीत लिहित जा.''

# जागतिक आश्चर्ये

### नेदरलँड येथील पूर नियंत्रण प्रकल्प

नेदरलँडच्या दक्षीण-पश्चिम सीमेवर पाणथळ भागावर बांधलेल्या वास्तुंची मालिका म्हणजेच जगातील सर्वात मोठा पूर नियंत्रण प्रकल्प गणला जातो. हा प्रोजेक्ट म्हणजे धरणांची मालिका होय. आधुनिक जगतात हा प्रोजेक्ट म्हणजे जगातील सातवे आश्चर्य मानले जाते.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९३

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | | ४ | ५ |
| ६ | | ■ | ७ | | ■ | ८ | |
| | ■ | ९ | | ■ | १० | | |
| ११ | १२ | | ■ | १३ | | ■ | |
| १४ | | ■ | १५ | | | १६ | ■ |
| १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | २० |
| ■ | ■ | २१ | | ■ | २२ | | |
| २३ | | | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द :-** १) तारा; चांदणी ३) इतर हलकी धान्ये ६) भक्त किंवा सेवक यांचा समुदाय ७) पुण्यवान लोक मेल्यानंतर येथे जातात असे म्हटले जाते ८) बरा; भला ९) धुंद; ताठलेला; जोरात १०) जंगलाला लागलेली आग; दावानल ११) तुळजापूरची देवी १३) माळा; एका झाडाचे पेय १४) दोन हातांतील जास्तीतजास्त अंतर; संधी; मोका १५) विचारविनिमय; खलबत १७) जीवन; पाणी; जल १८) स्वत:ला (एकवचन) १९) जखमेतून वाहणारा द्रव २१) दानधर्म करणारा २२) खिडकी; वातायन; झरोका २३) दयाळू; कृपाळू २४) मऊ; मृदू; मवाळ

**उभे शब्द :-** १) नटूनथटून गावभर हिंडणारी स्त्री २) तीस कला इतका काळ; काळाचा सूक्ष्म अंश ३) एखाद्या संख्येच्या वर्गाला त्याच संख्येने गुणून येणारी संख्या; क्लास ४) सोपे नसलेले; अवघड ५) नाजूक; सुकुमार; कोमल ७) महाग नसलेले; सवंग ९) मराठी मांजर; इंग्रजी पैसा १०) बाप; तात; जनक; पिता १२) येणेजाणे; राबता; वर्दळ; शेत; रान १३) उदाहरण; नमुना १५) मायाळू प्रेमळ १६) एक शस्त्र; समशेर २०) कार्यक्षम; क्षमता असलेला २१) शत्रुत्व; दुष्मनी; फिर्याद; हक्क; तक्रार २२) इंग्रजी बंदूक

### शब्दगंध क्र. ७०९२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | जा | नु | बा | हू | ■ | ग | ई |
| वा | ■ | क | रा | ल | ■ | वा | ■ |
| ज | रा | सा | ■ | ■ | भा | र | त |
| ■ | व | न | रा | ज | ■ | ■ | र |
| बा | ण | ■ | ग | र | ग | री | त |
| र | ■ | ध्या | ■ | ९ | ■ | ■ | री |
| दा | वा | न | ल | ■ | सं | ग | त |
| न | स | ■ | ता | शं | ग | ण | ■ |

# मुलांचे विश्व

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जेव्हा 'वसंत' येतो तेव्हा 'प्रकृती' सुधारते जेव्हा 'संत' येतात तेव्हा 'संस्कृती' सुधारते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## एचएमपीव्ही विषाणूचा प्रसार कशा प्रकारे होतो?

चीननंतर HMPV व्हायरस भारतातही पसरत आहे. देशात HMPV विषाणू प्रकरणांमध्ये वाढ होत आहे. एचएमपीव्ही विषाणूचे वाढते प्रमाण पाहता लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मात्र आरोग्य विभाग आणि सरकारने परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले आहे.

व्हायरसशी लढण्यासाठी देशात जोरदार तयारी सुरू आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात एचएमपीव्ही विषाणूचे रुग्ण झपाट्याने वाढतात. त्यामुळे या मोसमात या व्हायरसपासून बचाव करण्यासाठी खबरदारी घेणे गरजेचे आहे. दरम्यान, लोकांच्या मनात प्रश्न असा आहे की एचएमपीव्ही विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये कसा पसरतो?

एचएमपीव्ही विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये सहज पसरू शकतो. एखाद्या निरोगी व्यक्तीलाही संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात येऊन एचएमपीव्ही विषाणूची लागण होऊ शकते. संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आल्यानंतर, एखाद्या व्यक्तीला ३ ते ६ दिवसात HMPV विषाणूची लक्षणे दिसू शकतात. म्हणजे निरोगी व्यक्तीलाही संसर्ग होऊ शकतो. एचएमपीव्ही विषाणू संक्रमित व्यक्तीपासून निरोगी व्यक्तीमध्ये पसरू शकतो. त्यामुळे एचएमपीव्ही विषाणूची वाढती प्रकरणे लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक खबरदारी घेणे आवश्यक आहे. संक्रमित व्यक्ती शिंकते किंवा खोकते तेव्हा बाहेर पडणाऱ्या द्रवाच्या संपर्कात येऊन हा विषाणू पसरू शकतो.

जर एचएमपीव्ही विषाणूची लागण झालेली व्यक्ती शिंकत असेल किंवा खोकला असेल तर त्याच्या तोंडातून किंवा नाकातून बाहेर पडणारे थेंब निरोगी व्यक्तीला आजारी बनवू शकतात. जर निरोगी व्यक्ती संक्रमित व्यक्तीपासून ६ फूट पेक्षा कमी अंतरावर असेल तर संसर्ग होण्याचा धोका खूप जास्त असतो. एचएमपीव्ही विषाणू संक्रमित व्यक्तीच्या वैयक्तिक वस्तू वापरून देखील पसरतो. HMPV विषाणू संक्रमित व्यक्तीला किंवा विषाणू असलेल्या भागाला स्पर्श करून आणि तोंडाला किंवा डोळ्यांना हाताने स्पर्श केल्याने पसरतो.

## मुर्ख शत्रुत्व

एका गरुड पक्षीणीने एका मोठ्या झाडाच्या उंच फांदीवर आपले घरटे केले. त्या झाडाच्या मध्यभागी एक ढोली होती. त्यात एक रानमांजर राहत असे व झाडाच्या मुळाशी पोकळ जागा होती त्यात एक रानडुकरी आपल्या पिलांसह राहात असे. एके दिवशी मांजर गरुड पक्षिणीकडे जाऊन तिला म्हणाले, 'बाई, काय सांगू? आपल्यावर मोठा अनर्थ गुजरण्याची वेळ आली आहे. ती खाली असलेली डुकरी सगळा दिवस झाडाच्या मुळाशी उकरीत असते. एकदा झाड उपटून पडलं म्हणजे आमची पिलं सहजच आपल्या हाती लागतील,

'असं तिला वाटतंय. मी तर आता काय करावं याच काळजीत आहे.' अशा प्रकारे गरुड पक्षिणीच्या मनात भिती उत्पन्न करून ते दुष्ट मांजर तिला न कळत डुकरी जवळ आले व खिन्न चेहरा करून तिला म्हणाले, 'बाई, आज तुम्ही कुठं बाहेर जात नाही ?'

डुकरी म्हणाली, 'कां बर?' मांजर म्हणाले, 'सहजच पण खरं सांगायचं तर तुम्हाला एक बातमी सांगायची आहे. गरुड पक्षीण आपल्या पिलांना म्हणत होती की डुक्करी बाहेर गेली की, तिची पिलं मी तुम्हाला खाऊ घालीन, आणि एक मांजरीचं पिलू तोंडी लावायला देईन. हे तिचं बोलणं मी प्रत्यक्ष ऐकलं. आता मी जाते. माझी मुलं घरी एकटीच आहेत.'

इतके बोलून ते आपल्या ढोलीत गेले. याप्रमाणे पक्षीण व डुकरी यांच्यात एकमेकींच्याबद्दल खोट्या गोष्टी सांगून त्या मांजराने त्यांच्या मनात एकमेकींविषयी द्वेष उत्पन्न केला व खाणे मिळविण्यासाठी रात्री बाहेर जावे व दिवसा आपल्या ढोलीत पिलांजवळ बसून साशंक दृष्टीने खालीवर पहावे, असा क्रम त्याने ठेवला. ही त्याची वर्तणूक पाहून डुकरी व पक्षीण ह्या एकमेकींविषयी इतक्या साशंक झाल्या की, त्या आपली जागा सोडून कित्येक दिवस बाहेर पडल्या नाहीत. याचा परिणाम असा झाला की, त्या व त्यांची पिले अन्न न मिळाल्याने उपासमारीने मरण पावली व त्या दुष्ट मांजराची चंगळ झाली !

तात्पर्य - स्वार्थी व चहाडखोर माणसाच्या शब्दावर विश्वास ठेवून शेजाऱ्याशी शत्रुत्व करणे हा मूर्खपणा होय.

# रहमते दर्शन (भाग - १)



### वे विनम्रता के पुंज थे

महाराज जी व माता जी संगीत के बारे में मुझसे प्रश्न पूछते रहे। मैं उनके जवाब देता रहा। परन्तु एक बात मेरे मन में पैदा हो गई कि महाराज दर्शनसिंह जी हमें क्यों प्यार करेंगे? वो तो उनको प्यार करेंगे जिनको उन्होंने नाम दिया है। महाराज जी व माता जी के पास जब मैं बैठा हुआ था, उसी समय चोपड़ा जी व मेहता जी भी बैठे हुए थे। महाराज जी ने मुझसे कहा, याद रखो इस दुनिया में प्यार करने वाला केवल एक गुरु ही है। सुनकर मेरे मन का भ्रम दूर हो गया।

एक दिन शाम के समय हमारी P.R.O. की क्लास लगी हुई थी। हम सब नीचे बैठे हुए थे, जहाँ सत्संग हुआ करता था। उस समय महाराज संत दर्शनसिंह जी हमारी क्लास में आये और हमारे साथ नीचे ही बैठ गये। मैं बिल्कुल उनके नज़दीक बैठा हुआ था। महाराज जी ने हमें कई बातें बताईं । मैंने कहा, हुजूर, मैं एक बात पूछना चाहता हूँ। महाराज जी ने कहा, पूछो। मैंने कहा, हुजूर, मुझे संत मत की किताबें पढ़ने का बहुत मौका मिला है। मैं अन्दर के मंडलों के नाम भी जानता हूँ। किसी गैर सत्संगी को उनके नाम बतलाने चाहियें या नहीं? महाराज जी ने कहा, 'नहीं, उन्हें यहाँ ले आओ। मैंने कहा, हुजूर कई लोग कहते हैं कि हम आपके साथ क्यों चलें, और कहीं क्यों न चले जायें? महाराज जी ने मुझे जवाब दिया. यहाँ अनुभव की गारंटी है।

एक रविवार के दिन जब मैं सत्संग के लिए चला तो यह सोच रहा था कि आज मुझे गाँव जाना है। बस स्टॉप पर पहुँच कर मैं एक घंटे तक इसी कशमकश में रहा कि सत्संग सुनकर जाऊँ या बिना सत्संग सुने जाऊँ? आखिर मैंने यही फैसला किया कि सत्संग सुनकर गाँव जाऊँगा। सत्संग शुरू हुआ। संत दर्शनसिंह जी महाराज सत्संग कर रहे थे। आसमान साफ़ था। शायद मार्च का महीना था। अचानक दक्षिण-पूर्व दिशा की तरफ से घटा उठी। आसमान बादलों से भरने लगा। बडी ठंडी . शरीर को चुभने वाली हवा बहने लगी। बूँदें शुरू हो चुकी थीं। मेरे आस-पास से लोग उठकर पुरानी कोठी में, जिसे महाराज जी चड्ढा साहब का शीश महल कहा करते थे (क्योंकि उसमें चड्ढा साहब रहा करते थे), बारिश से बचने के लिए चले गये। सत्संग बदस्तूर जारी था। मैं अपने आस-पास बैठे लोगों से रुके रहने का आग्रह कर रहा था। परन्तु बारिश में भीग जाने से मेरा तन-बदन काँपने लगा और मैं भी चड्ढा साहब के शीश महल में जा छुपा। लगभग दस-पन्द्रह मिनट के बाद बारिश बंद हो गई।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

दिमाग विकास के स्तंभ जिस बात की ओर हमारा सब से ज्यादा ध्यान जाता है वह हमें सदैव स्मरण रहती हैं। मस्तिष्क में एक बार कोई बात घर कर जाती है तो उसे भुलाया नहीं जा सकता। आप अपनी स्मरण शक्ति बढ़ाना चाहते हैं तो इस के विकास पर ध्यान देना है। इस दुनिया में कोई भी बात आप के वश के बाहर नहीं है सब पर आप की पकड़ है। थोड़ा सा अभ्यास आप को कामयाब कर देगा। इस के लिये आप को एकाग्रता का अभ्यास बढाना है। एकाग्रता से हम मन की चमत्कारी शक्तियों को जागृत कर सकते हैं। ऋषि मुनि कोई अनोखे प्राणी नहीं थे। वे मनुष्य थे जैसे हम सब हैं। वे विलक्षण नहीं थे। प्रत्येक व्यक्ति को मानसिक और शारीरिक शक्तियों का विकास करना है, जैसे ऋषियों ने किया। शरीर के विकास के लिए प्रशिक्षण की जरूरत होती है। उसी प्रकार मानसिक विकास के लिये भी प्रशिक्षण की जरूरत होती है। मस्तिष्क में एक स्थान है जिसे कपाल गहर कहते हैं। इस जगह तंतुओं का सब से बड़ा सर्वाधिक जटिल पुंज है। जीवन के १८वें या २०वें वर्ष में इस का पूर्ण विकास होता है। इस के बाद इस जगह के शरीर का विकास रुक जाता है, परंतु मस्तिष्क का विकास यहां से पूरी उम्र होता रहता है। मन को अगर एकाग्र रखते हैं तो कपाल गहर का सूक्ष्म विकास होता है। अगर मन एकाग्र नहीं होता है तो इस स्थान से मानसिक शक्ति का नाश होता है। प्रायः मन बंदर की भांति एक वस्तु से दूसरी वस्तु, एक व्यक्ति से दूसरे व्यक्ति, एक इच्छा से दूसरी इच्छा की ओर दौड़ता है। दिमाग का विकास

एकाग्रता से दिमाग की स्मरण शक्ति का विकास होता है। मन से जिन चीजों को देखते हैं या सोचते हैं उनके गुण हमारे दिमाग में आने लगते हैं। हम क्रोध, अहंकार, ईर्ष्या के बारे सोचते हैं या कोई अवगुण दूसरों में देखते हैं तो उनके अवगुण हमारे में आने लगते हैं। ये नकारात्मक विचार हमारी मानसिक शक्ति नष्ट कर देते हैं। मानसिक शक्ति नष्ट होने से हमें घबराहट होती है। घबराहट कब होती हैं। जब पति घर से निकालने की धमकी देता है। जब बोस नौकरी से निकालने की धमकी देता है। जब बाप संपति से वंचित करने की धमकी देता है। आलोचना और बदनामी के डर से भी हमें घबराहट होती है। आप तेज गति से गाड़ी चला रहे हैं और सामने एक गाय आ गई, आप ने ब्रेक लगाई और ब्रेक फेल हो गई, आप को बहुत घबराहट होगी। कई लोगों को लिफ्ट पर चढ़ने से, भीड़ को देखने से तथा उचाई से भी घबराहट होती है। सुबह उठते ही घबराहट हो रही है। तो इसे नजरंदाज न करें। डाक्टर से राय लें। ये विटमिन डी की कमी हो सकती हैं। ऐसे ही अनेको अन्य कारण हैं जिन से हमें घबराहट होती है। घबराहट से स्मरण शक्ति के सूक्ष्म तंतु नष्ट हो जाते हैं। जिस से हम मन की श्रेष्ट शक्तियां जागृत नहीं कर पाते। सब के प्रति प्रेम का भाव रखें, ईमानदारी से कार्य करते रहें, दूसरों की दुआए प्राप्त करते रहें तो हमें घबराहट नहीं होगी। ऐसा करने से स्मरण शक्ति की कोशिकाएं शक्तिशाली बनती हैं। ज्यादतर हम बेमतलब का सोचते रहते हैं, ऐसा न हो जाए, वैसा न हो जाए, परंतु हकीकत यह है कि ८०% कभी होता ही नहीं जो हम सोचते हैं। इस लिये शांत रहें, आप की एकाग्रता बनी रहेगी।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

यासाठी डॉक्टर योनीमध्ये हात घालून गर्भाशया मधील रक्ताच्या गाठी काढून घेतात; यामुळे गर्भाशयाचे आकुंचन लवकर होते व रक्तस्राव कमी होतो.

जर रक्तस्राव जास्त असेल, तर डॉक्टर त्यावर औषधोपचार करतात. या अवस्थेमध्ये गर्भाशयाचा आकार बालक व अपरा बाहेर पडल्याने लहान होतो व त्यामुळे ते त्याच्या मूळ जागेवर परतते. अशा प्रकारे संपूर्ण प्रसूतिक्रिया साधारणतः ४ ते १० तास असते. संपूर्ण प्रसूती क्रिया सांगण्याचे कारण एवढेच आहे की, गर्भवतीला प्रसूतीबद्दल माहिती असावी, कारण अज्ञानामुळे स्त्री ऐनवेळेला घाबरून, भांबावून जाते व नैसर्गिक प्रसूती होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कळा व्यवस्थित घेत नाही म्हणून प्रसुतीची माहिती असल्यास ती बिनधास्त मनाने व न घाबरता प्रसुतीला सामोरे जाईल.

### प्रसूतिअवस्था

**नैसर्गिक प्रसुतीसाठी करावयाचे प्रयत्न**

१) प्रसूती नैसर्गिक व्हावी व स्त्रीला कळा सहज घेता याव्यात याकरिता सूतिकेला मानसिक आधाराची गरज असते; म्हणून परिचारिका व डॉक्टरांची मदत घ्यावी.

२) आयुर्वेदामध्ये अपानवायू प्राकृत अवस्थेत असेल तर नैसर्गिक प्रसूती होते; म्हणत अपानवायूला प्राकृत गती मिळण्यासाठी वातशामक द्रव्यांनी सिध्द केलेले तीळ तेल किंवा गर्भसंस्कार तेल बेंबी भोवती गोलाकार पद्धतीने लावावे. तसेच पाठीला व कमरेला हलक्या हाताने ते तेल चोळावे; त्यामुळे नैसर्गिक प्रसूती होण्यास मदत होते. थोड्या प्रमाणात एरंडेल तेल पिण्यास दिल्यासही बद्धकोष्ठता दूर होऊन कोठा साफ झाल्यामुळे अपानवायूला प्राकृत गती मिळते व त्यामुळे नैसर्गिक प्रसूती होण्यास मदत मिळते.

३) आयुर्वेदामध्ये विशिष्ट पध्दतीने अॅक्युप्रेशरचे पॉईंट दाबून हलक्या हाताने कमरेला, पाठीला व पोटाला वातशामक तेल किंवा गर्भसंस्कार तेल लावल्यास नैसर्गिक प्रसूती होते.

४) दोन कळांच्यामध्ये मार्जरासन करावे; त्यामुळे गर्भाशयाचे मुख उघडण्यास मदत होते व नैसर्गिक प्रसूती होऊ शकते.

**५) अॅक्युप्रेशर -**

या शास्त्रानुसार शरीरातील जे तेरा (१३) चेतनाप्रवाह वाहतात, त्यावर काही ठरावीक अॅक्युप्रेशरचे बिंदू असतात. त्याचा गर्भवतीच्या सुखकर प्रसूतीसाठी शास्त्रोक्त प्रेशर देऊन उपयोग केला जातो.

६) गर्भवतीच्या कमरेवर एपिड्युरल निस्थेशियाचे इंजेक्शन देतात व त्यानंतर वेदनारहित नैसर्गिक प्रसूती केली जाऊ शकते. यामध्ये गर्भवती न थकल्यामुळे नैसर्गिक प्रसूतीचे प्रमाण जास्त असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# रँकिंगबाबत चुकीचा अर्थ लावून झालेली ‘सक्तीच्या रजेची’ कारवाई मागे घ्यावी

## डॉ. अनिल बोरगे यांचे मनपा आयुक्तांना खुलासेवार पत्र

नगर – राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जिल्हा व महानगरपालिका स्तरावर महत्वाच्या आरोग्य निर्देशांकानुसार मासिक रँकिंग दिले जाते. हे रँकिंग म्हणजे स्पर्धा नसून सदर निर्देशांकानुसार आरोग्य सेवांच्या अद्ययावत परिस्थितीचे महापालिकांना आकलन व्हावे यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना रँकिंग दिले जाते. रँकिंगनुसार कामातील त्रुटी दूर करून आरोग्य सेवांमध्ये सुधारणा व्हावी हा उद्देश असतो. ही सर्व प्रक्रिया थेट शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग स्तरावर होते. यात रँकिग घसरल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असे कुठेही नमूद नाही. तरीही या प्रकरणी शासकीय पत्रकाचा चुकीचा अर्थ लावून माझ्यावर केलेली सक्तीच्या रजेवर जाण्याची कारवाई मागे घेऊन शासनाने मला अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये कलम ४५ (४) अन्वये दिलेल्या नेमणूकीनुसार माझे कामकाज करण्यास तात्काळ परवानगी द्यावी, असे पत्र वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना दिले आहे.या पत्राच्या प्रती नगरविकास खात्याचे प्रधान सचिव, आरोग्य सेवा संचालक तसेच राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाचे अतिरिक्त संचालक यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

डॉ.अनिल बोरगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, रँकिंग बाबत प्राप्त झालेल्या पत्रांचा चुकीचा अर्थ काढून मला सक्तीच्या रजेवर पाठविलेले आहे. या संदर्भात मी आपणास पत्र देवून सक्तीचा रजेचा आदेश मागे घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर पत्रामध्ये नमूद केल्यानुसार मी दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे संचालक, राज्य कुटूंब कल्याण कार्यालयात उपस्थित होतो. तेथे संबंधित अधिकारी यांना मी झाल्या प्रकाराबद्दल संपूर्ण माहिती दिलेली आहे व अहिल्यानगर महानगरपालिकेचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे रँकिंग झालेल्या कामाच्या अनुषंगाने चुकीचे असल्याबाबत निदर्शनास आणून दिलेले आहे. त्या संदर्भात सदरचे कामकाज पाहणारे अहिल्यानगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील वैद्यकिय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, नर्सेस यांना वेळोवेळी दिलेल्या सुचना, ज्ञापन व त्यांचे खुलासे या संदर्भात सुध्दा चर्चा झालेली आहे. त्यानुसार निश्चितपणे त्याची नोंद घेवुन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे रँकिंग सुधारणार आहे.

तथापि राज्य कुटूंब कल्याण कार्यालयाने जिल्हा व महानगरपालिका स्तरावरील आरोग्य निर्देशांकानुसार मासिक रँकिंग सुरू होण्यामागे संदर्भ क्रमांक ३ चे पत्र आपले निदर्शनास आणून देण्याकरीता व सक्तीच्या रजेची कार्यवाही चुकीचा अर्थ काढून झाल्याबाबत अवगत करण्याकरीता दिलेले आहे. सदरचे पत्र हे सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, सर्व वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्याकरीता असुन त्याच्या प्रती संचालक, आरोग्यसेवा, अतिरिक्त संचालक यांच्याकरीता आहे. सदरच्या पत्रामध्ये राज्यामध्ये जिल्हा स्तरावर जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी व महानगरपालिका स्तरावर वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या अधिनस्त आरोग्य संस्थाकडून आरोग्य सेवा दिल्या जातात. सदरील आरोग्य सेवांचा आढावा घेण्यासाठी/ माहिती मिळण्यासाठी निर्देशांक निश्चित करण्यात आले आहेत. या निर्देशांकानुसार आरोग्य सेवांचे महानगरपालिकांना आकलन व्हावे, यासाठी राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे दरमहा रँकिंग करण्याचा ऑगस्ट २०२२ मध्ये निर्णय घेण्यात आला आहे. असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचेवर सदरच्या रँकिगच्या क्रमानुसार त्यांच्यावर सक्तीची रजा लादणे, अथवा शिस्तभंग विषयक कारवाई करणे याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच सदरच्या पत्रामध्ये कार्यप्रणाली ठरवून दिलेली आहे. क्षेत्रिय स्तरावर कामे करणारे नर्सेस, वैद्यकिय अधिकारी, आशा सेविका, डाटा एंट्री ऑपरेटर यांना या संदर्भात शासनाकडून लॉग ईन आयडी व पासवर्ड उपलब्ध करून दिलेले आहेत. तसेच पत्रामध्ये सदरची कार्यवाही ही महानगरपालिकांच्या आरोग्य सेवेमध्ये सुधारणा व्हावी, क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कामातील त्रूटी समजाव्यात आणि त्यानुसार सुधारणा करण्यासाठी योग्य नियोजन करता येईल, असे उद्दीष्ट ठेवुन करण्यात येत आहे, असे नमुद केलेले आहे.

सदरच्या रँकिंगचा मूळ उद्देश लक्षात न घेता चुकीचा अर्थ काढून माझ्यावर सक्तीच्या रजेवर जाण्याचे आदेश निर्गमित झालेले आहेत.

तरी की माझ्यावर चुकीच्या पध्दतीने सक्तीच्या रजेवर जाण्याचा झालेला आदेश मागे घ्यावा, असे डॉ. बोरगे यांनी पत्रात म्हटले आहे.

# रँकिंगचा ठपका ठेवून कुठल्याही कर्मचाऱ्यावर कारवाई करू नका

## मनपा आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे आयुक्तांना निवेदन

नगर – सार्वजनिक आरोग्य विभागाकडून देण्यात येणारे रँकिंग घसरल्याचा ठपका ठेवत मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची कारवाई केली. या कारवाईमुळे आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. आरोग्य विभागात विविध केंद्रांवर कर्तव्य बजावणाऱ्या सुमारे ८० कर्मचाऱ्यांनी सोमवारी मनपा आयुक्त डांगे यांना निवेदन देवून रँकिंगच्या कारणावरून कुठल्याही कर्मचाऱ्यावर कारवाई करू नये अशी मागणी केली आहे. रँकिंगबाबत चुकीच्या पध्दतीने माहिती प्रसारित होत असल्याने पूर्ण कार्यक्षमतेने काम करूनही आमच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे अयोग्य असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मागील वर्षभरात आरोग्य कर्मचाऱ्यांना आरोग्य विभागाच्या नियमित कामा बरोबरच महापालिका प्रशासनाकडून अतिरिक्त कामे सोपविण्यात आली. आशा सेविकांनाही ही अतिरिक्त कामे करावी लागली. यात १२ आठवडे आयुक्तांच्या संकल्पनेतून डेंग्यु मुक्त अभियान राबविले, शासनाची वयोश्री योजना, लाडकी बहिण योजना, लोकसभा निवडणुकीकरिता आवश्यक आरोग्य विषयक कामकाज, विधानसभा निवडणुकीवेळी आवश्यक आरोग्य विषयक कामकाज, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री यांच्या दौऱ्यावेळी दिलेली जबाबदारी अशा अनेक कामांमुळे आरोग्य कार्यक्रमांचे निर्देशांक पूर्ण करण्याकरिता पुरेसा वेळच मिळाला नाही. दरम्यानच्या कालावधीमध्ये आरोग्य विभागाचे पोर्टल सुध्दा व्यवस्थित चालत नव्हते. त्यामुळे आम्ही केलेल्या कामकाजाची संबंधित पोर्टलवर नोंद घेण्यास अडचणी येत होत्या. तथापि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांनी वेळोवेळी बैठका घेवून, मार्गदर्शन करून आमचे कामकाज पूर्ण करून घेतले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या रँकिंगमध्ये मार्गदर्शक सूचनांनुसार सद्यस्थितीत सुधारणाही दिसून येत आहे.

अतिरिक्त कामकाजामुळे महापालिकेच्या रँकिंगवर परिणाम झाल्याची वस्तुस्थिती आहे. आम्ही सर्व कर्मचारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली अवरित आरोग्य विभागाचे कामकाज पाहत आहोत. प्रस्तुत प्रकरणी आरोग्य विभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्यावर रँकिंगचा ठपका ठेवून कारवाई करू नये. तसेच आपल्यामार्फत विविध माध्यमांना योग्य खुलासा आल्यास अहिल्यानगर महापालिकेची जनमानसातील प्रतिमा उजळण्यास नक्कीच मदत होईल. आमच्या वस्तुस्थिती दर्शक पत्राचा विचार करून रँकिंग करिता कोणालाही जबाबदार न धरता सदर प्रकरण बंद करावे असे निवेदनात म्हटले आहे.



### वाहतूक नियमाचे फलक हातात घेऊन जनजागृती रॅली

वाहतूक सुरक्षा सप्ताह निमित्त महाराष्ट्र पोलीस यांच्याकडून वाहतुकीच्या नियमांचे जनजागृती व्हावी यासाठी दिल्ली गेट ते न्यू आर्टस् कॉलेज रोड परिसरात एनसीसीच्या विद्यार्थी समवेत वाहतूक पोलीस यांच्यावतीने वाहतूक नियमाचे फलक हातात घेऊन जनजागृती रॅली काढण्यात आली. (छाया – अमित मन्यार)

# कुंभमेळ्याला जाण्यासाठी नगरकरांसाठी दोन रेल्वे

नगर – नगरकरांसाठी २६ फेब्रुवारीपर्यंत कुंभमेळ्याला जाण्यासाठी २ नवीन रेल्वे चालू केल्या आहेत. पुना ते मऊ गाडी क्र. ०१४५५ दर गुरुवारी दुपारी १२.५५ मिनिटांनी नगर रेल्वे स्थानकावर येणार व प्रयागराजला दुपारी ११,०० वा. पोहोचणार आहे. तसेच गाडी क्र. ०१४५६ मऊ ते पुना ही गाडी प्रयागराजला रविवारी सकाळी ९.२० वाजता निघणार व सोमवारी ११.२० मिनिटांनी नगर येथे पोहोचणार आहे.

दुसरी गाडी २२६८७ म्हैसूर–वाराणसी ही गाडी दर बुधवारी व शुक्रवारी सकाळी ८.१० ला नगर रेल्वे स्थानकावर येणार आहे व प्रयागराजला दुसऱ्या दिवशी ५.३३ ला पोहोचणार आहे.

वाराणसी ते म्हैसूर गाडी २२६८८ ही दर शुक्रवारी व रविवारी रात्री १२.५७ प्रयागराज वरुन निघणार व नगरला दुसऱ्या दिवशी ८.१८ मिनिटानी पोहोचणार असल्याची माहिती भा.ज.प. रेल्वे बोर्डचे जिल्हाध्यक्ष अनिल सबलोक यांनी दिली. अधिक माहितीसाठी मो.नं. ९४०५५७०२०६ यावर संपर्क करावा.



### महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेतर्फे आर डी मंत्री यांना विशेष सेवाव्रती कार्यकर्ता पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेतर्फे अहिल्यानगर येथील आर डी मंत्री यांना विशेष सेवाव्रती कार्यकर्ता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांना यापूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातर्फे देण्यात येणारा महेश भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

# राज्य नाट्य स्पर्धेतील तृतीय क्रमांकाच्या विजेत्या संघासह इतर सहा संघांनी नाकारली पारितोषिके

## स्पर्धेला अहिल्यानगर केंद्रावर गालबोट

नगर – महाराष्ट्र सरकार गेल्या कित्येक वर्षांपासून (इ.स. १९६१ पासून) राज्यातील सर्व कलांचे जतन, संवर्धन व त्यांमध्ये संशोधन करण्यासाठी नाट्य, साहित्य, नृत्य, संगीत, लोककला, दृक्कला व चित्रपट या कलांना समृद्ध आणि सक्षम करण्याचे व कलावंतांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ निर्माण करून सन्मान देण्याचे कार्य करीत आहे. परंतु अहिल्यानगर केंद्रावरील यंदा पार पडलेल्या ६३ व्या मराठी राज्य नाट्य स्पर्धेला मात्र निकालानंतर गालबोट लागले.

२५ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर २०२४ या कालावधीत अहिल्यानगर केंद्रावर एकूण १७ नाटकांपैकी १४ नाटके सादर झाली. मात्र निकाल लागल्यानंतर निकालाबाबत प्रचंड मोठ्या प्रमाणात संशय कल्लोळ निर्माण झाला. निकालावर ६ संघानी नाराजी व्यक्त केली असून, त्यांनी मिळालेली एकूण चौदा पारितोषिक नाकारत असल्याचे पत्र सांस्कृतिक संचालनालयाला दिले आहे.

या नाराज झालेल्या संघांच्या म्हणण्यानुसार अहिल्यानगर केंद्रावर स्पर्धेदरम्यान असलेल्या ३ परीक्षकांपैकी एकाने या निकालात प्रचंड मोठी गडबड केल्याचे निदर्शनास आल्यानंतर या संघानी माहितीच्या अधिकारात मागवलेल्या निकालात खाडाखोड असल्याचे आढळले आहे. तसेच शंका निर्माण होतील, अशा इतर बाबी देखील दिसून येतात.

पारितोषिक नाकारलेल्या संघामध्ये जय बजरंग युवा सांस्कृतिक क्रीडा ग्रामीण शिक्षण मंडळाने सांघिक तृतीय क्रमांकाच्या पारितोषिकासह पुरुष अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र, प्रकाश योजना द्वितीय क्रमांक, नेपथ्य द्वितीय क्रमांक, रंगभूषा द्वितीय क्रमांक ही पारितोषिके नाकारली असून वात्सल्य प्रतिष्ठान या संस्थेने प्रकाशयोजना प्रथम क्रमांक, तसेच स्त्री व पुरुष अभिनयाची गुणवत्ता प्रमाणपत्रे नाकारली आहेत. नाट्य आराधना या संस्थेने स्त्री अभिनयाचे रौप्यपदक तर कल्पद्रुम फाउंडेशन या संस्थेने प्रथम क्रमांकाचे नेपथ्याचे पारितोषिक नाकारले आहे. नाट्य मल्हार या संस्थेने पुरुष अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्राची दोन्ही पारितोषिके नाकारली आहेत. संगमनेर येथील संगम ग्राम विकास मंडळ या संस्थेने त्यांना जाहीर झालेले रंगभूषा प्रथम क्रमांक आणि स्त्री अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र ही दोन्ही पारितोषके नाकारली आहेत. एकाच वेळी इतक्या संघांनी पारितोषिके शासनास परत करण्याची ही कदाचित पहिलीच वेळ असून घडल्या प्रकाराने निकालात किती मोठा घोटाळा असू शकतो, याचा अंदाज येतो. घडलेल्या प्रकारामध्ये अहिल्यानगर येथील एका स्पर्धक संघांने हस्तक्षेप केला असल्याचे इतर अनेक संघाचे आरोप आहेत. या सर्व घडामोडींची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना निवेदनाद्वारे देण्यात आलेली आहे, अशी माहिती संजय लोळगे यांनी दिली आहे.

# इतिहासाबद्दल संशय निर्माण करुन तो पुसण्याचे काम सुरु

## योगेश साठे यांचे प्रतिपादन; वंचित बहुजन आघाडीच्या आढावा बैठकीत येणाऱ्या निवडणुकांवर चर्चा, कार्यकर्त्यांचा प्रवेश

नगर – भाजप सरकार सत्तेत आल्यापासून महापुरुषांची सातत्याने अवहेलना होत आहे. गेल्या काही दिवसांपासून फातिमा शेख या काल्पनिक पात्र असल्याच्या अफवा पसरविण्याचे काम केले जात आहे. फातिमा शेख या सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून बहुजनांच्या शिक्षणासाठी झटत होत्या. धार्मिक द्वेषाचे वातावरण निर्माण करण्याचे काम सत्ताधारी करत आहे. इतिहासाबद्दल संशय निर्माण करुन ते पुसण्याचे काम सुरु असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी केले.



वंचित बहुजन आघाडीची जिल्हा, शहर, तालुका आणि युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक नगरच्या शासकीय विश्रामगृह येथे पार पडली.

वंचित बहुजन आघाडीची जिल्हा, शहर, तालुका आणि युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक नगरच्या शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी साठे बोलत होते. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष हनिफ शेख, शेवगाव तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलूमे, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, सल्लागार जे. डी. शिरसाठ, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगादिवे, रविकिरण जाधव, सचिन गायकवाड, पिनु भोसले, युवा उपाध्यक्ष गणेश शिरसाठ, कर्जत शहराध्यक्ष राहुल पोळ, युवा तालुकाध्यक्ष बुवासाहेब चव्हाण, ऑगस्टीन गजभिव, बाळू गजभिव, राहुल गजभिव, अबिद शेख, ॲड. योगेश गुंजाळ, चंद्रकांत नेटके आदीसह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करुन या बैठकीचा प्रारंभ करण्यात आला. पुढे योगेश साठे म्हणाले की, फुले दाम्पत्याला घर सोडावे लागले तेव्हा फातिमा शेख यांचे बंधू उस्मान यांच्याकडे त्या राहत होते. नायगाव इथून दिलेल्या पत्रामध्ये सावित्रीबाईंनी फातिमाचा उल्लेख केलेला आहे. इतिहासाबद्दल संशय निर्माण करणाऱ्या खोडसाळपणाची दखल आज घेतली नाही, तर काळ सोकावेल, आज फातिमा शेख आहेत, उद्या माता रमाई, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, राजमाता जिजाऊ किंवा सावित्रीबाई फुले असतील. प्रचार तंत्राच्या माध्यमातून खोट्याचे खरे करण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत पदाधिकाऱ्यांना आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग, गट व गण बांधणीचे आवाहन करण्यात आले. बुथ बांधणी करून सक्षम उमेदवाराची चाचपणी करून उमेदवार देण्यासाठी चर्चा करण्यात आली. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करुन दररोज पक्षासाठी वेळ देवून पक्ष बांधणी काम करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी बोधेगाव ग्रामपंचायत सदस्य सुनील खंडागळे यांच्यासह वसंत साबळे, प्रथमेश सोनवणे यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. शहराध्यक्ष हनीफ शेख यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय पातळीवरील एनसीपीडीए संघटनेच्या सचिवपदी डॉक्टर सुचित तांबोळी यांची निवड

नगर – हैदराबाद येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील बालरोग तज्ञ संघटनेच्या परिषदेमध्ये डॉ. सुचित तांबोळी यांना मानद वक्ता म्हणून बोलवण्यात आले होते. त्यांनी असंसर्गजन्य आजार (नॉन आजार) म्हणजेच उदाहरणार्थ डायबिटीस, ब्लडप्रेशर, स्थूलता, हृदयाचे आजार, कॅन्सर यांचे मूळ पौगंड अवस्थेत कशाप्रकारे असते याची माहिती देऊन हे आजार कसे टाळता येतील, यावर शालेय पातळीवर, राज्यपातळीवर, आणि राष्ट्रीय पातळीवर काय काय प्रयत्न करायला पाहिजेत याविषयी चर्चा केली. त्यांनी नुकत्याच भारत सरकारने सुरू केलेल्या EAT RIGHT INDIA तसेच अन्य राष्ट्रीय कार्यक्रमाची माहिती दिली, हे आजार टाळण्यासाठी योग्य आहार, मीठ व साखरेचे प्रमाण कमी करणे, रोज कमीत कमी एक तास व्यायाम, वजन नियंत्रणात राखणे, दारू आणि सिगरेट यांचे व्यसन मुक्त भारत तयार करणे, रक्तातली साखर नियंत्रणात ठेवणे इत्यादी सारखे उपाय पाळल्यास या मोठ्या आजारांपासून मुलांना संरक्षण मिळते.




राष्ट्रीय पातळीवरील बालरोग तज्ञ संघटनेच्या परिषदेमध्ये मानद वक्ता म्हणून बोलताना डॉ. सुचित तांबोळी

दुसऱ्या एका भाषणामध्ये त्यांनी २०२२ मधील कारा गाईड लाईन्स आणि दत्तक विधान याविषयी बालरोग तज्ञांना सखोल माहिती दिली जन्मदाती आई आणि दत्तक आई यांचे प्रश्न तसेच मुलांना कसे? कधी? किती? सांगायचे याबद्दल मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय बालरोग तज्ञ संघटनेचे आयपी कॉफी सिप अंतर्गत प्रकाशित वाढविकास वर्तन समस्या या पुस्तकाचे अॅक्डमीक संपादक म्हणून डॉ. सुचित तांबोळी यांनी काम पाहिले, हे पुस्तक या परिषदेत प्रकाशित झाले.

राष्ट्रीय पातळीवरील असंसर्गजन्य म्हणजेच नॉन कम्युनिकेबल डिसीजेस चॅप्टर NCPDA या संघटनेचे सचिव म्हणून डॉ. सुचित तांबोळी यांची दोन वर्षांसाठी निवड झाली.

या परिषदेला सबंध भारतातून ७ हजार बालरोगतज्ञ उपस्थित होते.

# चेक न वटल्याप्रकरणी आरोपीस दीड वर्षाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील प्रथम न्यायदंडाधिकारी सुपेकर मॅडम यांनी आरोपी रावसाहेब पांडुरंग कचरे यास एक वर्ष सहा महिन्याची शिक्षा तसेच चेकची रक्कम १०,२०,६८१/– फिर्यादी पतसंस्थेस चेक ज्या तारखेस वाटला नाही, तेव्हापासून ७ टक्के व्याज दराने देण्याचा हुकूम केला.

कै.राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्था शाखा–कापूरवाडी, ता.जि.अहिल्यानगर येथून आरोपी रावसाहेब पांडुरंग कचरे यांनी कर्ज घेतले होते. कर्ज थकीत गेल्यानंतर आरोपीकडे थकीत रकमेची मागणी केली असता आरोपीने थकीत रकमेचा रु.१०,२०,६८१/– चा चेक दिला, तो वाटला नाही म्हणून फिर्यादी पतसंस्थेने आरोपीविरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे अहमदनगर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात केस दाखल केली होती. त्या केसचा गुणदोषावर निकाल होऊन आरोपी रावसाहेब पांडुरंग कचरे यास एक वर्ष सहा महिनेची शिक्षा तसेच चेकची रक्कम रु.१०,२०,६८१/– चेक वाटला नाही त्या तारखेपासून ७ टक्के व्याजाने फिर्यादी पतसंस्थेस देण्याचा कोर्टाने हुकूम केलेला आहे. सदरची रक्कम निकाल तारखेपासून तीन महिन्यात फिर्यादी पतसंस्थेस आरोपीला द्यावयाची आहे. आरोपीने त्याप्रमाणे रक्कम फिर्यादी पतसंस्थेला न दिल्यास आरोपीस पुन्हा चार महिन्याच्या शिक्षेचा हुकूम केलेला आहे. फिर्यादी पतसंस्थेमार्फत ॲड. बाबासाहेब एन. रणसिंग व ॲड.विनोद बी. रणसिंग यांनी काम पाहिले.

# मल्लखांबपटू प्राची खळेकर व आदिनाथ साठे यांची खेलो इंडियासाठी निवड

नगर – भोपाळ येथे एल.एन.सी.टी. विश्वविद्यालयाच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत अहिल्यानगर मल्लखांब व योगा सेंटरचे खेळाडू चमकले. या राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत प्राची खळेकर व आदिनाथ साठे यांनी चमकदार कामगिरीने त्यांची खेलो इंडिया स्पर्धे साठी निवड झाली आहे, अशी माहिती मुख्य प्रशिक्षक अनिकेत सुसरे यांनी दिली.

या स्पर्धेत देशभरातील ७० हून अधिक विद्यापीठांमधील ६०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये अहिल्यानगर मल्लखांब व योगा सेंटरची खेळाडू प्राची खळेकर हिने चमकदार कामगिरी करत सांघिक रौप्यपदक पटकावत मनोरे स्पर्धेतही कांस्यपदक पटकावले. तसेच आदिनाथ साठे यानेही आपल्या लक्षवेधी खेळमधून सांघिक सुवर्णपदक पटकावले. या दोघांनी मिळवलेल्या यशामुळे पुढील महिन्यात होणाऱ्या खेलो इंडिया राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धे साठी या दोघांची निवड झाली आहे.

खेळाडू प्राची खळेकर आणि आदिनाथ साठे या खेळाडूंना अहिल्यानगर मल्लखांब व योगा सेंटरचे मुख्य प्रशिक्षक अनिकेत सुसरे, प्राजक्ता दळवी, सुजाता सब्बन, चंद्रशेखर चवंडके, श्रेणिक गांधी, शुभम शिंगटे यांचे मार्गदर्शन लाभले.



अहिल्यानगर मल्लखांब व योगा सेंटरचे खेळाडू प्राची खळेकर व आदिनाथ साठे यांची खेलो इंडिया राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# काकासाहेब म्हस्के यांनी सर्वसामान्यांच्या हितासाठी आयुष्य वेचले

## माजी कुलगुरु डॉ.सर्जेराव निमसे यांचे प्रतिपादन; पुतळ्याचे अनावरण, आरोग्य भूषण पुरस्कार डॉ.विनोद शहा यांना प्रदान



काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या काकासाहेब म्हस्के स्मृती पुरस्कार सोहळ्याप्रसंगी माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे.

नगर – माजी आमदार काकासाहेब म्हस्के यांनी गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी आयुष्य वेचले. राजकारणातील अजातशत्रू, सालस आणि पारदर्शक कारभारासाठी ओळखले जाणारे व्यक्तीमत्व होते. कृषि, जलसंधारण, आरोग्य, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य अतुलनीय आहे. दुष्काळ निवारणासाठीचे त्यांचे कार्य राज्यात आदर्शवत असून ते नगर तालुक्याचे विकासपुरुष असल्याचे प्रतिपादन नांदेड आणि लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांनी व्यक्त केले. चाळीस वर्षांपूर्वी त्यांनी जलसंधारणाचे काम करत विक्रमी पाझर तलावांची उभारणी केली यातून त्यांची दुरदृष्टी समजते असेही ते म्हणाले.

काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या काकासाहेब म्हस्के स्मृती पुरस्कार सोहळ्याप्रसंगी डॉ.निमसे बोलत होते. यावेळी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ.सुभाष म्हस्के, जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.विनोद शहा, जागतिक आरोग्य संघटनेचे माजी प्रतिनिधी डॉ.सुभाष साळुंखे, विश्वस्त डॉ.सुमति म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ.दिप्ती ठाकरे, सीईओ आर्किटेक्ट समीर ठाकरे, डॉ.केतकी म्हस्के, काकासाहेब म्हस्के होमिओपॅथी मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक रेगे, काकासाहेब म्हस्के फार्मसी कॉलेजचे प्राचार्य प्रा.नितीन ठुबे, पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अजित चवरदार, डॉ.भास्करराव पालवे, डॉ. उत्तमराव शिंदे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.निमसे आणि मान्यवरांच्या हस्ते काकासाहेब म्हस्के यांच्या पुतळ्याचे संस्था आवारात अनावरण करण्यात आले. तसेच जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.विनोद शहा यांना आरोग्य भूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. काकासाहेब म्हस्के यांच्या नावाचा पुरस्कार मिळाला याचा आनंद वाटत असून म्हस्के फाउंडेशन आणि परिवाराने पुरस्कार देत माझ्यासह जनसेवा फाऊंडेशनच्या कार्याचा केलेला गौरव आम्हाला पाठबळ आणि प्रेरणा देणारा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी डॉ.सुभाष म्हस्के म्हणाले, सर्वसामान्यांसाठी वैद्यकीय शिक्षणाची दारे काकासाहेब म्हस्के यांच्या विचारांमुळे खुली झाली. राजकारणाविरहित त्यांचे कार्य होते. समाजकारणासह सर्व क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांच्या विचारांचा वारसा समृध्दपणे पुढे नेण्याचे काम त्यांच्या तिसऱ्या पिढीच्या माध्यमातून घडत आहे. त्यांचा वारसा आणि विचार असाच अविरतपणे सुरु राहील अशी ग्वाही त्यांनी त्यांनी यावेळी दिली. पुरस्कार सोहळ्यानंतर वंध्यत्व निवारण या विषयावर इंटर सिस्टीम सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.केतकी म्हस्के, वैद्य ज्योती तनपुरे, होमिओपॅथी तज्ञ डॉ.अमोल राणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत श्रीशा आहेर प्रथम



नगर – शहरात पार पडलेल्या जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत श्रीशा राजश्री शरद आहेर या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला. तिने किशोर गटातून शाहीर मीराबाई उमप यांची प्रभावीपणे साकारलेली वेशभूषेनुसार भूमिका जिल्हास्तरावर अव्वल ठरली आहे.

रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये नुकतीच ही स्पर्धा पार पडली. श्रीशा आहेर ही कोपरगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बहादरपूरची (केंद्र – पोहेगाव) विद्यार्थिनी आहे. तिने सतत दोन वर्ष तालुकास्तरावर प्राविण्य मिळवले होते. जिल्हास्तरासाठी पात्र ठरली नाही म्हणून अपयशाने खचून न जाता आपल्या मेहनत व जिद्दीच्या जोरावर यावेळी तिने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

तसेच शाळेतील कल्याणी शिवाजी रहाणे, प्रियंका विठ्ठल रहाणे, सोहम पोपट कुडके या विद्यार्थ्यांनीही वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये जिल्हास्तरासाठी कोपरगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करुन आपल्या कलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या यशाबद्दल जिल्हा शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, गटविकास अधिकारी संदीप दळवी, गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, विस्तार अधिकारी श्रीमती पुजारी, केंद्रप्रमुख भारती शेळके, मुख्याध्यापक चंद्रकांत डोंगरे, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. वर्गशिक्षक रामदास गव्हाणे, मुरलीधर वाकचौरे, गणेश पाचोरे, शरद आहेर, स्वाती मसुते, सारिका गावित, धनश्री भिवसन यांनी श्रीशास मार्गदर्शन केले.



इनामदार, मुतवल्ली, सज्जादा ॲण्ड ट्रस्टीज् फेडरेशन (वक्फ) महाराष्ट्र राज्यच्या अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी लतीफ बनेमियाँ इनामदार यांची निवड करण्यात आली.

# इनामदार, मुतवल्ली, सज्जादा ॲण्ड ट्रस्टीज् फेडरेशन (वक्फ) महाराष्ट्रच्या अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी लतीफ इनामदार

नगर – इनामदार, मुतवल्ली, सज्जादा ॲण्ड ट्रस्टीज् फेडरेशन (वक्फ) महाराष्ट्र राज्यच्या अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी लतीफ बनेमियाँ इनामदार, राहणार मढेवडगाव, तालुका श्रीगोंदा यांची निवड करण्यात आली.

जालना शहरातील दर्गाह राजा बाग सवार परीसर १२ जानेवारी रोजी नविन जिल्हानिहाय पदाधिकारी निवड बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी ट्रस्टीज् फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष गौसभाई शिरोळकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यातील २२ जिल्हा अध्यक्ष पदाची निवड करण्यात आली.

इनामदार, मुतवल्ली, सज्जादा ॲण्ड ट्रस्टीस फेडरेशनचे महासचिव मौलाना जमील जानिमिया सय्यद, राज्य उपाध्यक्ष इलियासोद्दिन खतीब, ॲड. मेहबूब निजामी, ॲड. शाहरुख पठाण आदि उपस्थित होते.

# पाथर्डीच्या श्रीक्षेत्र मोहटादेवीगडावर 'शांकभरी नवरात्रोत्सवा'ची सांगता



श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे शांकभरी नवरात्रोत्सवाची सांगता झाली.

नगर – श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान येथे शांकभरी नवरात्रोत्सवाची सांगता पारंपारिक उत्साहात व वेदमंत्रांच्या जयघोषात झाली. राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविकांनी दिवसभरात भेट देवून दर्शन घेतले. सप्तशती पाठांची पुर्णाहुती होमहवनाने झाली.

देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, डॉ. श्रीधर देशमुख यांच्या हस्ते होमहवन महापुजा करून वेदमंत्राच्या घोषाने परिसर दुमदमला.

देवस्थानमार्फत वासंतिक, शारदीय व शांकभरी अशी तीन नवरात्रे साजरी होतात. शांकभरी नवरात्रोत्सवामध्ये रोज पारंपारिक उत्सव, त्रिकाल आरत्या, सुवासिनी पूजन, अन्नदान करण्यात आले. शाकाहार महात्म्य व उपयोगिता याबाबतचे वर्णन देवी महात्म्य मध्ये सांगून शांकभरी पौर्णिमेशी त्याचा संबंध आहे. शांकभरी पौर्णिमेला गावोगावच्या सुवासिनी विविध प्रकारच्या पालेभाज्या व पुरणपोळीचा महानैवेद्य देवीला आणतात. नवसाची पुर्ती झाली म्हणुन सवाष्णी जेवु घालण्याची मोहटादेवी गडावर परंपरा आहे.

सकल भारतवासीय देवीभक्तांचे उत्तम आरोग्य व धनधान्य, सुख समृध्दी प्राप्त व्हावी, जणमाणंसामध्ये ऐक्य, प्रेमभाव निर्माण व्हावा, असा संकल्प करुन देवीस प्रार्थना करण्यात आली.

पुणे येथील उद्योजक राजेंद्र भोंडवे परिवाराने संकल्पपूर्ती झाल्याने शांकभरी पौर्णिमेस देवीच्या मंदिर गाभाऱ्याची आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली.

होमहवन कार्यक्रमास सौ. लता दहिफळे, सौ. पुजा वाडेकर, डॉ. ज्योती देशमुख, राहुरी येथील बंडेशकुमार शिंदे, सौ. शुभांगी शिंदे, सौ. मनिषा आहेर, विश्वात्मक जंगली आश्रम कोकमठाणचे विश्वस्त प्रभाकर जमधडे, देवस्थानचे विश्वस्त बाळासाहेब दहिफळे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, कर्मचारी, ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे पौरोहित्य भूषण साकरे, भास्कर देशपांडे, महेश झेंड, विशाल पाटेगावकर, रुपेश जोशी, बाळासाहेब क्षीरसागर, भगवान जोशी यांनी केले. शांकभरी पौर्णिमेनिमीत्ताने हरी कीर्तन, भजन व भावीक भक्तांना महाप्रसाद वाटप करणेत आला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकतीचे ७/१२ सदरी दत्तु गंगाधर बरबडे, चंद्रकांत गंगाधर बरबडे, बाबासाहेब गंगाधर बरबडे यांचे नावाची पोकळीस्त नोंद आहे. सदर मिळकतीचा गट नं. २० /१ असा असून वर नमुद इसमांनी खोटी व दिशाभुल करणारी माहिती देवून, खोटे कागदपत्र तयार करून नगररचना विभागाशी संगनमत करुन यापुर्वीच बेकायदेशीररित्या लेआऊट तयार करुन प्लॉट पाडलेले आहेत. सदर लेआऊट करताना लगतचे सहहिस्सेदार म्हणून आमचे अशिल यांची कसल्याही प्रकारची संमती घेतलेली नव्हती व नाही. सदर लेआऊटमध्ये प्लॉट नं. ३ व ओपन स्पेस हे केवळ कागदोपत्री दाखविण्यात आलेले असून ते भौगोलिक दृष्टया अस्तित्वात नाहीत. सदर बेकायदेशीर बिगरशेती आदेश व लेआऊटबाबत आमचे अशिल लवकरच संबंधित कार्यालयामध्ये तक्रार करणार आहेत. अशी वस्तुस्थिती असताना प्लॉट नं.३ हा प्लॉटच अस्तित्वात नसताना देखील तो अस्तित्वात असल्याचे खोटे भासवुन वर नमुद इसमांनी ७/१२ सदरी स्वत:चे नावाची नोंद केलेली आहे. सदर बेकायदेशीर ७/१२ उताऱ्याचा गैरफायदा घेवून वर नमुद इसमांनी सदरची मिळकत विक्रीस काढलेली असून सदरची मिळकत विक्री करण्याचा त्यांना कसल्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही. सदर मिळकतीबाबत कोणाचीही फसगत होवू नये व सदर मिळकतीबाबत कोणीही खरेदी, बक्षीस, गहाण, दान, मुखत्यार इ. दस्तान्वये व्यवहार करु नये. त्यास आमचे अशिलाची सक्त हरकत आहे. याउपरही सदरची नोटीस प्रसिध्द होवूनही सदर मिळकतीबाबत विद्यमान मालकाशी व्यवहार केल्यास तो आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही व खरेदीखताने सदर मिळकतीचा ताबा खरेदी घेणार यांना मिळणार नाही. यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे.

परिशिष्ट

डि।। अहमदनगर व अ.नगर महानगरपालिका हद्दीतील भिस्तबाग येथील बिगरशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –

| गट नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|
| २०/१ | ३ | १३१.२५ |

यासी चतु:सिमा रेकॉर्डप्रमाणे–

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक वागणुकीच्या व वहिवाटीच्या हक्कांसहीत तदंगभुत वस्तुसहीत काहीही एक राखुन न ठेविता.

तारीख : १५/०१/२०२५
अहमदनगर.

ॲड. प्रशांत मोरे
बार रुम नं. ४, नवीन जिल्हा न्यायालय, अहमदनगर
मो. ९९७०२६२९७४


# १९ जानेवारी रोजी प्रज्ञाशोध परीक्षा

नगर – डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान व विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र) संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहिल्यानगर द्वारा आयोजित प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्रांवर १९ जानेवारी रोजी घेण्यात येणार आहे.

या परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) www. vpahmednagar.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सर्व संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी प्रवेशपत्र संकेतस्थळावरून काढून मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीसह नियोजित परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना वेळेवर पाठवावे, असे आवाहन परीक्षा संचालक व नियंत्रक यांनी केले आहे.



जिल्हा मुख्याध्यापक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्यातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना देताना शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित. समवेत सहसचिव प्रा.संभाजीराव पवार, प्रा. रामराव साबळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी.

# शिक्षकांना जुनी पेन्शन, शिक्षक भरती व शाळांना वाढीव टप्पा देण्यास प्राधान्य देऊ

## मंत्री दादा भुसे यांचे आश्वासन; जिल्ह्यातील मुख्याध्यापक व शिक्षकांनी मांडले प्रलंबित मागण्यांचे गाऱ्हाणे

नगर – अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्यातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन, शिक्षक भरती यासह विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना देण्यात आले. मुख्याध्यापक संघाच्या शिष्टमंडळाने मंत्री भुसे यांची मुंबईत भेट घेऊन प्रलंबित मागण्यांचे गाऱ्हाणे मांडले. यावेळी कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष व महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, नगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सहसचिव प्रा.संभाजीराव पवार, प्रा. रामराव साबळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री भुसे यांनी शिष्टमंडळाच्या सर्व मागण्या सविस्तरपणे समजून घेतल्या. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी मान्यता प्राप्त असलेले व २००५ नंतरचे टप्पा अनुदान मिळालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन व अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा देणार असल्याचे सांगून शिक्षक भरतीसाठी पवित्र प्रणालीही सुरु करणार असल्याचे आश्वासन शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शिष्टमंडळाला दिले.

निवेदनात म्हटले आहे की, शिक्षकांची व्हॉटस ॲप द्वारे मागितली जाणारी माहिती तत्काळ बंद करावी. शिक्षक, मुख्याध्यापक यांना पी.एफ.च्या पावत्या त्वरीत मिळणे बाबत. थकित मेडिकल बिले व इतर पुरवणी बिले त्वरीत मिळवेत. ऑनलाईन बिले दिल्यानंतर हार्ड कॉपीची सक्ती करु नये. लेखाधिकारी कार्यालयातील प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करावीत. कायम विना अनुदानित, अंशतः अनुदानित स्वयंअर्थ सहाय्यित शाळांचे व अनुदानित शाळांच्या व चालू वर्षांच्या संच मान्यता त्वरीत मिळाव्यात. पुर्वीप्रमाणे शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे स्थायी / अस्थायी मान्यता त्वरीत मिळावी. नावात व आडनावातील दुरुस्तीचा दाखल प्रस्ताव ८ दिवसात मंजूर केले जावेत शिक्षकांच्या येथून पुढे ऑनलाईन मान्यता मिळाव्यात सेवानिवृत्त होणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणे सहा महिने अगोदर देण्याचे संस्थांना आदेश द्यावेत. प्रलंबित शालार्थ आय डी चे प्रस्ताव त्वरीत निकाली काढण्यात यावेत. आर. टी.ई नुसार सर्व शाळांच्या स्व–मान्यतेची कामे अद्याप अपूर्ण आहेत. ते १०० टक्के पूर्ण करावे. शालेय पोषण आहाराचे थकीत बिले त्वरित मिळावेत. नोव्हेंबर २००५ पुर्वी मान्यता प्राप्त असलेले व २००५ नंतर टप्पा अनुदान मिळालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन त्वरीत मिळावी. अशंत: अनुदानित शाळांना वाढीव टप्पा त्वरीत मंजूर करावा, आदी मागण्या मांडल्या.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक – १५/०१/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **जिल्हापरिषद** हद्दीतील **मौजे वाळुंज** येथील खालील वर्णनाची मिळकत–

| सर्व्हे / गट नंबर | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| ११५ | ३हे. ६९आर | १३ रु. ६२ पैसे |

यापैकी विद्यमान मालक यांचे मालकीचे पूर्व दक्षिण कोपऱ्यातील क्षेत्र १हे. २३ आर.हि मिळकत.

**यांसी चतु:सीमा** –

पूर्वेस : सर्व्हे / गट नंबर ११६
दक्षिणेस : सर्व्हे / गट नंबर ११७अ१
पश्चिमेस : सर्व्हे / गट नंबर ११४
उत्तरेस : सर्व्हे / गट नंबर ११५

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**उत्कर्षा बलभिम गलांडे**
रा. सारसनगर, अहिल्यानगर (अहमदनगर).

**ॲड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**ॲड. सौ. नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं.९०२८००८२००
पत्ता – भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहिल्यानगर (अहमदनगर)



## जाहीर नोटीस

तमाम अहमदनगर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे प्रकाश भिमराज कराळे यांचे मालकी हक्काची मौजे भिंगार, नगर–पाथर्डी रोड येथील सर्व्हे नंबर १/पै यातील क्षेत्रफळ ४०९.२८ चौ.मी. ही स्वतः च्या मालकी हक्काची होती आणि आहे.

सदरील मिळकत मे. श्रेयश डेव्हलपर्स चे प्रो. (१) श्री. लोकेश हेमंतदास मेहतानी आणि (२) श्री. विजय अनिल भूतकर यांना विकसित करणेसाठी दिलेली होती आणि आहे. सदरील मिळकत ही त्यांनी विकसित केलेली असून अजून काही भागाचे बांधकाम बाकी आहे. सदरील विकसित केलेल्या जागेमध्ये आमच्या अशिलाचा १/३ अविभक्त असा हिस्सा आहे. सदरील इमारतीमध्ये मे. श्रेयश डेव्हलपर्स चे प्रो. श्री. लोकेश हेमंतदास मेहतानी आणि श्री. विजय अनिल भूतकर आणि आमचे पक्षकार नामे प्रकाश भिमराज कराळे यांच्या मध्ये कोणत्याही प्रकारचे वाटप झालेले नाही. तसेच सदरील इमारतीमध्ये कोणाचा भाग, कोणता हे ठरविण्याचे बाकी आहे. अशी परिस्थिती असताना श्रेयश डेव्हलपर्स चे प्रो. लोकेश हेमंतदास मेहतानी आणि विजय अनिल भूतकर सदरील इमारती मधील ग्राऊंड फ्लोअर मधील गाळे आणि १ ल्या, २ रा आणि ३ रा मजल्या वरील ऑफीसेस साठीची जागा हे विकण्याच्या तयारीत आहेत.

सबब सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरील व्यक्तीबरोबर कोणत्याही प्रकारचा खरेदीचा व्यवहार करू नये. सदरील व्यक्तीबरोबर काही मिळकतीबाबत व्यवहार (खरेदी–विक्री)चा केल्यास सदरील व्यवहार हा आमच्या पक्षकारावर व मिळकतीवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसगत आणि फसवणूक होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्धीस दिली असे. कळावे. दि. १५/१/२०२५

**नोटीस देणार**
**श्री. कराळे प्रकाश भिमराज**
रा. प्लॉट नं. ४, संदीपनगर,
सारसनगर, मार्केटयार्ड, अहमदनगर.
मो. ९४२२२२१९०८

**ॲड. जंबुरे नितीन विश्वनाथ**
घ.नं. २०३३, डावरे गल्ली,
अहमदनगर.
मो. ७०८३४१८९८६



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **अराफत अंजुम इनामदार रा. सी ४ कृष्णा एन्क्लीव्ह, आर. टी. ओ. ऑफिस, औरंगाबाद रोड, अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीनीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, जिल्हापरिषद हद्दीतील मौजे **जेऊर** येथील दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील हंगामी बागायत शेतजमीन मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे–

| ग.नं. | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १३६ / १३७/२ | जि. ०.६८<br>बा. ०.४९<br>१.१७ | ४.५० |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची उत्तरेकडील बाजुची ० हे २४ आर पैकी ० हे ११ आर जमीनी बाबत.

**यांसी चतु:सिमा :**


पुर्वेस – गट नं. १३६/१३७/२ पैकी क्षेत्र
दक्षिणेस – गट नं. १३५ व १३६/१३७/२ पैकी क्षेत्र
पश्चिमेस – १५ फुट रस्ता
उत्तरेस – रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता..

दि. १५/०१/२०२५
अहमदनगर

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८


# नगरच्या कवयित्री सरोज आल्हाट यांची मराठी साहित्य संमेलनासाठी निमंत्रित कवी म्हणून निवड



नगर – येथील कवयित्री सरोज आल्हाट यांची दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन करिता निमंत्रित कवी म्हणून निवड करण्यात आली आहे.

२२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या बहुभाषिक कवी संमेलनामध्ये निमंत्रित कवी म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने त्यांची नियुक्ती केल्याची माहिती सरहद पुणेचे राहुल मेंगडे व देशपाल जवळगे यांनी पत्राद्वारे आल्हाट यांना कळविले आहे.

सरहद पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा २१, २२, २३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी, तालकटोरा स्टेडियम दिल्ली येथे होणार असून, स्वागत अध्यक्ष शरद पवार व संमेलन अध्यक्ष म्हणून डॉ. तारा भवाळकर उपस्थित असणार आहेत.

सरोज आल्हाट वयाच्या दहाव्या वर्षापासून लिखाण करत असून, त्यांचे चार मराठी व एक इंग्रजी काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहे. त्यांना अनेक राष्ट्रीय व राज्य पातळीवरील मानाचे पुरस्कार देखील मिळाले आहेत.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **शेख मुनाफ रियाजोद्दीन रा. घर नं. १९१८, हातमपुरा, अहमदनगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिलांबरोबर सदरची मिळकत कायम खुष खरेदी देण्याचे ठरवून विसाराची रक्कम देखील स्विकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

**१) मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील शहर अहिल्यानगर (अहमदनगर) येथील मोची गल्ली भागातील मे. दु. निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील मिळकत खालीलप्रमाणे–**

| सि.स.नं. | चौ. मीटर |
|---|---|
| २८०८ /अ | ३३.४० |

**यापैकी विद्यमान यांच्या मालकीची ११.९३ चौ. मी. दुकान मिळकत पैकी (२१ इंच X १० फुट सोडुन) पूर्व बाजुची दुकान मिळकत त्याचे क्षेत्र ९.५२ चौ. मी. याची उत्तर - दक्षिण लांबी १२० इंच असुन रुंदी पुर्व पश्चिम ८७ इंच आहे. तसेच तळमजल्यावरील दगड मातीत मधील असलेले बांधकाम क्षेत्र ९.५२ चौ. मी. व पहिला मजल्यावरील टी अँगल मधील असलेले बांधकाम क्षेत्र ९.५२ चौ.मी. तसेच यातील लाईट मीटर व लाईट फिटींगसह संपुर्ण दुकान मिळकत बाबत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – सि.स.नं. २८०८/अ पैकी भळगट यांची मिळकत
दक्षिणेस – रस्ता
पश्चिमेस – सि.स.नं. २८०८/अ पैकी लिहून देणार व शोएब रियाजुद्दीन शेख यांची उर्वरीत मिळकत
उत्तरेस – सि.स.नं. २८०८

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता..

दि. १५/०१/२०२५
अहमदनगर

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कॅलिडोस्कोप



## हरखले मन

*डोंगरांच्या माथ्यावरी*
*आले विसावया मेघ*
*तरुतळी झाली तळी*
*त्यात अमृताचा ओघ*
*दूर क्षितिजी सजली*
*इंद्रधनूची कमान*
*सात रंगांचा सोहळा*
*पाहे हरखून मन*

## पुरुषाला प्रसूती रजा?

एखादा पुरुष गरोदर असल्याचे ऐकले आहे का? बिहारच्या शिक्षण विभागाने एका पुरुष शिक्षकाला गर्भवती केले. वास्तविक शिक्षक गर्भवती नव्हता, तर शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे त्याला प्रसूती रजेवर पाठवण्यात आले. हे प्रकरण समोर आल्यानंतर बिहार शिक्षण विभाग आणि शिक्षकांची खिल्ली उडवली जात आहे.



हे विचित्र प्रकरण वैशाली जिल्ह्यातील हाजीपूरचे आहे. येथे महुआ ब्लॉक परिसरातील हसनपूर ओसती हायस्कूलमध्ये एक शिक्षक तैनात आहे. त्याचे नाव जितेंद्र कुमार सिंह आहे. त्याला गरोदर ठरवून शिक्षण विभागाने घरी सोडले. ही प्रसूती रजा शिक्षण विभागाच्या ई–शिक्षा कोश पोर्टलवर देण्यात आली होती. ही रजाही त्यांनी अधिकृत वेबसाइटवर अपलोड केली. शिक्षण विभाग आणि अधिकृत वेबसाइटच्या नजरेनुसार शिक्षक जितेंद्र गरोदर असून रजेवर आहेत.

शिक्षण विभागाने महिलांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय रजेचा फायदा पुरुष शिक्षकाला दिल्याने इतर शिक्षकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. पुरुष शिक्षकाला प्रसूती रजा देण्याबाबत ब्लॉक शिक्षण अधिकारी अर्चना कुमारी म्हणाल्या, की तांत्रिक कारणामुळे ही अनियमितता झाली. पुरुष शिक्षकाला अशा प्रकारे रजा दिली जात नाही. या घटनेची माहिती विभागाला मिळताच त्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. या त्रुटीबद्दल शिक्षणाधिकाऱ्यांनी खंत व्यक्त करत ही चूक विभाग तातडीने दुरुस्त करेल, असे सांगितले.



## भन्नाट रेस्टॉरंट्स

घरच्या जेवणाचा कंटाळा आला की आपण एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जातो. रेस्टॉरंटमध्ये जायचा प्लॅन एका क्षणात ठरतो. आवडतं रेस्टॉरंट धुंडाळलं जातं आणि मस्तपैकी जेवणाचा आस्वाद घेतला जातो. मात्र एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जाण्यासाठी चार महिने वाट बघावी लागत असेल तर किंवा एखाद्या रेस्टॉरंटमध्ये सर्वत्र बर्फच बर्फ असेल तर... जगभरात अशी काही भन्नाट रेस्टॉरंट्स आहेत. अशाच काही रेस्टॉरंट्सची सैर करू या. चीनमधल्या शांघाय शहरामध्ये 'अल्ट्राव्हायोलेट' नावाची एक इमारत आहे. मात्र ती नेमकी कुठे आहे हे कोणालाच माहीत नाही. इथल्या एका रेस्टॉरंटमध्ये दर संध्याकाळी खास स्वयंपाक केला जातो. अनेकविध पदार्थांची मेजवानी असते. इथे जाण्याआधी नोंदणी करावी लागते. साधारण चार महिने आधी बुकिंग केल्यानंतर या ठिकाणी जेवणाची संधी मिळते. रेस्टॉरंटमध्ये येणाऱ्या लोकांना विशिष्ट ठिकाणी बोलावलं जातं. मग तिथून त्यांना गुप्त पद्धतीने रेस्टॉरंटमध्ये नेतात. रेस्टॉरंटचा डायनिंग हॉल साधाच आहे. पण इथल्या जेवणाची चव जिभेवर रेंगाळते. दुबईमध्ये 'चिलआउट आईस लाउंज' आहे. या रेस्टॉरंटमध्ये चहूबाजूला फक्त बर्फच दिसतो. इथलं फर्निचरही बर्फाचंच आहे. अंतर्गत सजावटीसाठी बर्फाचाच वापर करण्यात आला आहे. खुर्चीवर ॲक्रेलिक पॅड्स बसवण्यात आली आहेत. थंडी वाजली तर ग्राहकांना जॅकेट्स उपलब्ध करून दिली जातात. या रेस्टॉरंटमध्ये छान गारेगार वाटतं. इथे जेवण्याची मजा वेगळीच असणार यात शंका नाही.






## भेट तुझी माझी

जोड्या स्वर्गात बनलेल्या असतात. या पृथ्वीवर माणसं फक्त एकमेकांना भेटतात, असं म्हटलं जातं. या जगात कोण, कोणाला कधी भेटेल याचा काहीच नेम नसतो. कॉलेजच्या वयात प्रेम जडतं. पण काही कारणांनी लग्न होऊ शकत नाही. नवा संसार थाटला तरी प्रियकर आणि प्रेयसी एकमेकांसाठी झुरत रहातात आणि अशातच अचानक अनेक वर्षांनी प्रियकर आणि प्रेयसी एकमेकांना भेटले तर... अशीच एक घटना फ्रान्समध्ये घडली. इथे एक प्रेमी जोडपं तब्बल ७५ वर्षांनी एकमेकांना भेटलं. यातल्या प्रियकराचं वय होतं ९७ वर्षं तर प्रेयसीही ९२ वर्षांची झाली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात म्हणजे १९४४ मध्ये २४ वर्षांचा केटी रॉबिन्स १८ वर्षांच्या जेनिन पियरसनला भेटला. पाहताक्षणीच ते एकमेकांच्या प्रेमात पडले. रॉबिन्स अमेरिकेचा तर जेनिन फ्रान्सची होती. रॉबिन्स अमेरिकन सैन्यात होता. त्यामुळे तो रणभूमीवर निघून गेला. त्यावेळी जेनिन खूप रडली. तिने त्याची वाटही बघितली. पण रॉबिन्स काही आला नाही. मात्र एकमेकांच्या आठवणी त्यांच्या मनातून कधीही गेल्या नाहीत. ९७ वर्षांचे रॉबिन्स एका कार्यक्रमाच्या निमित्ताने फ्रान्सला गेले होते. त्यावेळी ते जेनिनला भेटले. या क्षणी दोघंही खूप भावूक झाले होते. रॉबिन्स अमेरिकेला परत निघून गेले. पण जाताना त्यांनी जेनिनला परत भेटण्याचं वचनही दिलं.

## नववधूच्या घरावर लाखो रुपयांचा पाऊस!



लग्न म्हणजे दोन जीवांचं मिलन... लग्न केवळ दोघांचेच होत नाही, तर त्यासोबत दोन कुटुंबही एकत्र येतात. आजकालच्या बदलत्या काळानुसार लग्न म्हणजे एक एव्हेंट झाले आहे. प्रत्येकाला लग्नात मोठ्यातला मोठा खर्च करून दाखवायचे असते, तर काही लोक लग्न अगदी साध्या पद्धतीने करतात. लग्नात प्रत्येकाला काहीतरी खास करायचे असते. अनेक वेळा वराच्या किंवा वधूच्या विचित्र मागण्या ऐकून लोक आश्चर्यचकित होतात. सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला. त्यात एक हेलिकॉप्टरमधून लाखो रुपयांच्या नोटांची उधळण करत असल्याचे दिसत आहे. वधूच्या वडिलांच्या मागणीवरून वराच्या वडिलांनी हेलिकॉप्टर भाड्याने घेतले होते. ते पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक जमले होते. वराच्या वडिलांनी मुलाच्या लग्नासाठी विमान भाड्याने घेतले आणि वधूच्या घरी लाखो रुपयांची उधळण केली. आता नवरा मुलगा वडिलांचे ऋण आयुष्यभर फेडत राहणार असे दिसते. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. एका सोशल मीडिया यूजरने लिहिले, की ही केवळ पैशाची उधळपट्टी आहे, दुसरे काही नाही. दुसऱ्याने लिहिले, की वधूच्या घरावर सत्ता दाखवण्यासाठी लोक कर्जही घेतात. एकाने लिहिले, की वधू–वरांना बाजूला ठेवा, आज त्यांचे शेजारी सर्वात जास्त आनंदी असतील, कारण त्यांच्या घरावर नोटांचा पाऊस पडला आहे.




## असंही स्वागत!

आपण पावसाची अत्यंत आतुरतेने वाट बघत असतो. पाऊस पडावा म्हणून बरेच उपाय केले जातात. काही ठिकाणी बेडकांचं लग्न लावलं जातं. मान्सूनचं आगमन झाल्यानंतर भारतातल्या विविध प्रांतांमध्ये आनंद साजरा केला जातो. आनंद साजरा करण्याच्या अनेक पद्धती आहेत. कर्नाटकमध्ये पाऊस पडल्यानंतर लोक चिखलात नाचतात. 'केसर्ड ओंजी दिना' या नावाने हा उत्सव साजरा केला जातो. 'एक दिवस चिखलात नाचा' असा याचा अर्थ होतो. मंगळुरूमधल्या शेतांमध्ये या उत्सवाचं आयोजन केलं जातं. सर्वच स्तरातले नागरिक यात सहभागी होतात. ज्ञानशक्ती सुब्रमण्यम स्वामी मंदिरातर्फे या उत्सवाचं आयोजन केलं जातं. यावेळी नागरिक नृत्य करत लोकगीतं म्हणतात. यासोबतच चिखलातच विविध खेळ खेळले जातात. शेतांमध्ये पाणी साचलं की या उत्सवाचं आयोजन होतं. इथे खूपच धम्माल येते.

## वर्गात पाहत होते आक्षेपार्ह व्हिडीओ!

उत्तर प्रदेशात एका शिक्षकाने आठ वर्षांच्या विद्यार्थ्याला बेदम मारहाण केली. झासी येथे ही घटना घडली आहे. शिक्षक वर्गामध्ये बसूनच पॉर्न व्हिडीओ पाहत होता. विद्यार्थ्याने शिक्षकाला वर्गात पॉर्न पाहताना पाहिल्यानंतर जोरात हसू लागला होता. यामुळे शिक्षक चिडला आणि विद्यार्थी जखमी होईपर्यंत त्याला जबर मारहाण केली. मुलाला मारहाण झाल्याचे समजल्यानंतर त्याच्या पालकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी याप्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शिक्षक कुलदीप यादवला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.



कुलदीप यादव हा शिक्षक वर्गात बसून आक्षेपार्ह पॉर्न व्हिडीओ पाहत होता. यामुळे एक विद्यार्थी आणि त्याचे वर्गमित्र जोरजोरात हसू लागले होते. यामुळे कुलदीप यादव इतका चिडला, की त्याने विद्यार्थ्याचे केस धरून उभे केलं. इतकेच नाही तर त्याने विद्यार्थ्याचे डोके भिंतीवर जोरात आदळले. मुलाच्या वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियेमुळे यादवचा संताप झाला. त्याने माझ्या मुलाला शिवीगाळ केली आणि अत्यंत बेदम मारहाण केली. त्याने माझ्या मुलाला केसांनी पकडले आणि त्याचे डोके भिंतीवर आपटले. त्याने छडीनेही माझ्या मुलाला मारहाण केली. माझा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्या कानालाही जखम झाली आहे.

मुलाच्या वडिलांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी शिक्षक कुलदीप यादवला चौकशीसाठी ताब्यात घेतले.



## विमानाचं मायलेज किती?

विमानाची उड्डाणं सतत सुरू असतात. विमानप्रवासामुळे वेळेची बचत होत असली तरी इंधनाचा खूप वापर होतो. चारचाकी गाडी घेताना आपण तिचं मायलेज बघतो. गाडीत एक लीटर पेट्रोल किंवा डिझेल भरल्यानंतर ती किती किलोमीटर धावते यावर बरंच काही अवलंबून असतं. अशा परिस्थितीत एक लीटर इंधन भरल्यानंतर विमान किती अंतर कापू शकतं, हा विचार तुमच्या डोक्यात कधी आला आहे का? विमानाच्या मायलेजबाबत जाणून घेणं रंजक ठरेल.

उड्डाण केल्यानंतर विमान एका सेकंदात साधारण चार लीटर इंधन खर्च करतं. 'बोईंग ७४७' या विमानाला मिनिटभराच्या प्रवासासाठी २४० लीटर इंधन लागतं. बोईंगच्या संकेतस्थळावर याबाबत माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार 'बोईंग ७४७' ला दहा तासांच्या प्रवासासाठी तब्बल ३६ हजार गॅलन म्हणजे १,५०,००० लीटर इंधन लागतं. एक मैल अंतरासाठी या विमानाला साधारण पाच गॅलन इंधन लागतं. म्हणजे प्रति किलोमीटर अंतर कापण्यासाठी 'बोईंग ७४७' ला १२ लीटर इंधन लागतं. या विमानातून एकाच वेळी ५०० प्रवासी प्रवास करतात. म्हणजे १२ लीटर इंधन भरल्यानंतर एवढे प्रवासी एक किलोमीटर अंतर पार करतात. म्हणजे हे विमान एक किलोमीटर अंतर कापण्यासाठी प्रत्येक व्यक्तीवर ०.०२४ लीटर इंधन खर्च करतं. मायलेजबाबत बोलायचं तर हे विमान एक लीटर इंधनात ०.८ किलोमीटर अंतर कापतं. हे अंतर अर्थातच खूप कमी आहे.

## रुग्णसेवेचा अनोखा मार्ग

वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करून देण्यासाठी इंडोनेशियामध्ये बायकर्स ग्रुपची स्थापना करण्यात आली आहे. 'इंडोनेशियन ॲस्कॉर्टिंग ॲम्ब्युलन्स ग्रुप' देशातल्या ८० शहरांमध्ये कार्यरत असून या ग्रुपचे दोन हजार सदस्य आहेत. रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी हा ग्रुप झपाटल्याप्रमाणे काम करतो. अनेकजण रुग्णसेवेचं व्रत स्वीकारतात. या बायकर्सनीही हे व्रत स्वीकारलं आहे. रुग्णसेवेची त्यांची पद्धत वेगळी आहे. स्वतःच्या बाईकवर स्वार होऊन हे बायकर्स रुग्णवाहिकेच्या पुढून आणि मागून चालत रहातात. मध्ये येणाऱ्या वाहनांना बाजूला करून रुग्णवाहिकेसाठी मार्ग मोकळा करतात. या सेवेसाठी कोणतंही शुल्क आकारलं जात नाही. इंडोनेशियातल्या रस्त्यांवर खूप गर्दी असते. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका वेळेत न पोहोचल्याने रुग्णांचा जीव जातो. ही बाब लक्षात आल्यानंतर काहीजणांनी पुढाकार घेऊन रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करायचं ठरवलं. २०१७ मध्ये जकार्तामध्ये ५० जणांच्या बायकर्स ग्रुपची स्थापना झाली. त्यानंतर या ग्रुपच्या सदस्यसंख्येत वाढ होत गेली. बायकर्सचा हा ग्रुप पूर, भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींमध्येही मदतकार्य करतो. इंडोनेशियातल्या प्रमुख रुग्णालयांकडे बायकर्स ग्रुपच्या सदस्यांचे मोबाईल क्रमांक आहेत. रुग्णवाहिका अडकल्यानंतर त्यांना तातडीने संदेश पोहोचतो आणि बायकर्स मदतीला धावतात. बायकर्स ग्रुपचं हे कार्य वाखाणण्याजोगं आहे.




## येथे दुबईपेक्षा स्वस्त सोने!


भारतीय आणि त्यांचे सोन्यावर असलेले प्रेम हे जगभरात प्रसिद्ध आहे. प्रत्येक भारतीय महिलेला आणि पुरुषालाही आपल्या अंगावर सोने असावे, अशी इच्छा असते. सोने हे केवळ दागिने नसून ते गुंतवणुकीचे माध्यम म्हणूनही अनेकजण त्याकडे पाहतात आणि आपला पैसा गुंतवतात.

भारतात आता सोन्याच्या किमतींनी कळस गाठला आहे. सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेर त्याच्या किमती गेल्या आहेत. त्यामुळे दुबई आणि इतर अरब देशांतून सोने आणण्याकडे अनेकांचा कल आहे; पण दुबईपेक्षाही स्वस्त सोने जगात आणखी एका देशात मिळते. जगातील सर्वात स्वस्त सोने कोणत्या देशात मिळते असा प्रश्न पडला असेल, तर त्याचे उत्तर भूतान असे आहे. जगातील सर्वात स्वस्त सोने आशियाई देश भूतानमध्ये मिळते.

*** भूतानमध्ये सोने स्वस्त का ?**

भूतानमध्ये सर्वात स्वस्त सोने मिळण्याची अनेक कारणे आहेत. भूतानमध्ये स्वस्त सोने मिळण्याची अनेक कारणे असली, तरी सर्वात मोठे कारण म्हणजे भूतानमध्ये सोने हे करमुक्त आहे. सोने स्वस्त असण्याचे तेच सर्वात मोठे कारण मानले जात आहे. याशिवाय भूतानमध्ये सोन्यावर कमी आयात शुल्क आहे. भूतान आणि भारताच्या चलनाचे मूल्य जवळपास सारखेच आहे.

*** सोने खरेदी करताय, अटी पाहा**



भूतानमधून सोने खरेदी करताना काही अटी लक्षात ठेवाव्या लागतील. सोने खरेदी करण्यासाठी पर्यटकांना भूतान सरकारने प्रमाणित केलेल्या हॉटेलमध्ये किमान एक रात्र मुक्काम करावा लागतो. पर्यटकांना भूतानमध्ये सोने खरेदीसाठी अमेरिकन डॉलर आणावे लागतात. पर्यटकांना शाश्वत विकास शुल्क (एसडीएफ) भरावे लागते. त्याच वेळी भारतीयांना प्रति व्यक्ती प्रतिदिन १,२०० ते १,८०० रुपये मोजावे लागतात. पर्यटकांना सोने खरेदी करण्यासाठी पावती घेणे आवश्यक आहे. भूतानमधील ड्युटी–फ्री शॉपमधून ड्युटी–फ्री सोने खरेदी करता येते. ही दुकाने सामान्यत: लक्झरी वस्तूंची विक्री करतात आणि ती वित्त मंत्रालयाच्या मालकीची असतात.

# पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव रद्द करावा

नगर – पाणीपट्टीच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न व पाणीपुरवठा व्यवस्थेवर होणारा खर्च यात दिवसेंदिवस तफावत वाढत चालली असल्यामुळे पाणीपट्टी करात दुपटीने वाढ करण्याचा विषय स्थायी समितीने मंजूर केला असल्याची माहिती वर्तमानपत्रांमधून मिळाली. गेल्या २१ वर्षांपासून पाणीपट्टी वाढविण्यात आलेली नसल्याचा उल्लेख बातम्यांमध्ये आहे. पाणीपट्टी दरवाढीचा हा प्रस्ताव पुढील बाबींचा विचार करून तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्ताचा प्रशासक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की,

१) २१ वर्षांपूर्वी नळ जोडधारकांची संख्या किती होती ? आणि आज किती आहे?

२) २१ वर्षांमध्ये किती अनधिकृत नळजोड शोधण्यात आले?

३) पाणीपुरवठा उत्पन्न व खर्चातील तफावत कमी करण्यासाठी आजपर्यंत काय प्रयत्न करण्यात आले?

४) केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमधून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा प्रकल्प राबवून पाणीपुरवठा व्यवस्थेतील विज बिल कमी करण्यासाठी गेल्या २१ वर्षांमध्ये काय प्रयत्न करण्यात आले?

५) जे नळधारक सध्या प्रामाणिकपणे पाणीपट्टी भरतात त्यांच्यावर पडणारा हा प्रस्तावित दरवाढीचा बोजा अन्यायकारक आहे. अनधिकृत नळजोड धारकांवर या प्रस्तावित दरवाढीचा काही एक परिणाम होणार नाही.

६) शहरात कार्यक्षम पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून गेल्या २१ वर्षांमध्ये कोणकोणत्या योजना (अमृत/ फेज २ इत्यादी) राबविण्यात आल्या? त्यांची सद्यस्थिती काय आहे?

७) पाणी वितरण व्यवस्थेतील खर्चाची तफावत कमी करण्यासाठी महापालिका प्रशासनाने वरील उपाययोजना न करता पाणीपट्टी दरवाढीचा निवडलेला सोपा मार्ग अन्यायकारक आहे. त्यामुळे आधी वरील प्रमाणे उपाययोजना कराव्यात. नंतरच एकदम शंभर टक्के दरवाढ करण्याऐवजी टप्प्या टप्प्याने १० टक्के, २० टक्के, ३० टक्के अशी दरवाढ करणे योग्य होईल. या उपाययोजना न केल्यास दुप्पटच काय, तिप्पट दरवाढ केली तरी तफावत कमी होईल असे वाटत नाही. आणि कारवाई होत नाही हे लक्षात आल्यावर अनधिकृत नळजोड संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल.

तसेच पाणीपुरवठा खर्च व उत्पन्न तफावत कमी करण्यासाठी व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञ प्राध्यापक व विद्यार्थी यांची अभ्यास समिती नियुक्त करून त्यांच्याकडून सूक्ष्म अहवाल तयार करून घ्यावा. यामध्ये धरणातून होणारा पाणी उपसा व वितरण याचा देखील सूक्ष्म अभ्यास करण्यात यावा.

या सर्व बाबींचा सारासार विचार करून महासभेपुढील प्रस्तावित पाणीपट्टी दरवाढ रद्द करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# महानगरपालिकेने पाणीपट्टी दरात केलेली वाढ त्वरित रद्द करावी अन्यथा 'आंदोलन'

## आमदार संग्राम जगताप यांचा इशारा, प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन



वाढविलेल्या पाणीपट्टीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल या आशयाचे निवेदन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देताना आ.संग्राम जगताप व इतर. (छाया – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेवर प्रशासक म्हणून कारभार करत असताना आयुक्तांनी अचानक पाणीपट्टी वाढ केली असून ती अन्यायकारक आहे, जरी ते प्रशासक असले तरी नागरिकांच्या भावना लक्षात घेणे गरजेचे होते पण त्याचा कुठेही विचार केलेला दिसत नाही. तरी वाढविलेल्या पाणीपट्टीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना आ. संग्राम जगताप यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी जल अभियंता परिमल निकम, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, सुरेश बनसोडे, बाळासाहेब जगताप, सचिन जगताप, कौशल गायकवाड, सागर गोरे, आकाश दंडवते, ओंकार घोलप आदी उपस्थित होते

अहिल्यानगर शहरातील नळ धारकांच्या पाणीपट्टी दरात स्थायी समितीच्या माध्यमातून १०० टक्के इतकी भरमसाठ वाढ केल्याचे समजते. आम्ही या दरवाढीचा तीव्र विरोध करतो, कारण ही वाढ सर्वसामान्य नागरिकांसाठी अतिशय जाचक आहे. दरवाढ करताना नागरिकांवर पडणाऱ्या आर्थिक बोजाचा पुरेसा विचार झाल्याचे दिसत नाही. पाणी पुरवठा योजना खर्चिक आहे, हे मान्य असले तरी नागरिकांवर अतिरक्त आर्थिक भार पडणार नाही, याची दक्षता घेतली जाणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर आपण याचा पुनर्विचार करून पाणीपट्टी दरवाढ मर्यादित ठेवावी. तसेच, शहरातील ज्या भागांमध्ये ३–४ दिवसांनी पाणी पुरवठा होतो किंवा अत्यल्प पाणी मिळते, त्या भागांतील नागरिकांसाठी मीटरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा पर्याय उपलब्ध करून द्यावा. याशिवाय, मीटरद्वारे दिल्या जाणाऱ्या पाण्याचे दर वाजवी ठेवावेत, जेणेकरून नागरिकांना अनावश्यक आर्थिक भार सहन करावा लागणार नाही. तरी या संदर्भात त्वरीत कार्यवाही करून शहरातील नागरिकांच्या पाणी पट्टी दरात केलेली भरमसमाट वाढ रद्द करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# आधी नियमित व पुरेशा दाबाने पाणी द्या त्यानंतरच महापालिकेने दरवाढ करावी

## भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांची आयुक्तांकडे मागणी



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी नगरकरांना पाणी पुरवठ्यासाठी होणाऱ्या खर्चात वाढ झाल्याने पाणी पट्टीत दुपटीने वाढ करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेत ठेवण्यात येणार आहे. लोकनियुक्त सभागृह नसताना आयुक्तांनी घेतलेल्या या निर्णयाला राजकीय पक्षांकडून विरोध सुरू झाला आहे. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी महापालिकेच्या पाणी वितरण नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत पाणी पट्टी वाढीस विरोध केला आहे. सदर दरवाढ अन्यायकारक असून प्रशासनाने आधी नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करावा आणि नंतर टप्प्याटप्प्याने दरवाढ करावी अशी मागणी ॲड.आगरकर यांनी केली आहे.

ॲड. अभय आगरकर यांनी म्हटले आहे की, मनपा आयुक्तांनी पाणी पट्टी १५०० रूपयांवरून थेट ३००० रूपये करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. ही दरवाढ सामान्य जनतेसाठी अन्यायकारक आहे. मुळात नगर शहरात अनेक भागात दिवसाआड तर काही भागात आठवड्यातून एकदा पाणी पुरवठा होतो. एक तासभर पाणी सोडले जाते. तेवढ्या वेळेत नागरिकांना आठवडाभर पुरेल इतके पाणी मिळत नाही. सरकारच्या योजनेतून फेज टू पाणी योजना राबविण्यात आली. तिचे काम पूर्ण झाल्याचे सांगण्यात येते. या योजनेतून नळ जोडणीसाठी नागरिकांकडून मोठी रक्कम घेण्यात आली. प्रत्यक्षात पैसे देऊन फेज टूची जोडणी घेतली तरी नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळत नाही. अमृत योजना राबवून थेट मुळा धरणापासून पाणी योजनेचे सक्षमीकरण करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. परंतु ही योजना पूर्णतः अपयशी ठरली आहे ही वस्तुस्थिती आहे. कोट्यवधी रुपये खर्च झाला तरी पाणी पुरवठा नियमित झालेला नाही. हे मनपा प्रशासनासाठी पूर्णतः नामुष्कीची गोष्ट आहे. २४ किलोमीटर अंतरावरून पाणी आणताना विज बिल तसेच इतर खर्च वाढतो हे खरच आहे. पण एवढा खर्च होऊनही पुरेशा दाबाने पाणी मिळत नसेल तर नागरिकांनी पाणी पट्टी वाढ का सहन करावी? हा खरा प्रश्न आहे.

काळानुरूप पाणी पुरवठा करताना खर्च वाढणे साहजिकच आहे. परंतु या वाढत्या खर्चाप्रमाणे सुविधाही वाढणे आवश्यक आहे. दुर्दैवाने नगर शहरात पाणी पुरवठा नियमित होत नाही. अनेकदा दुरूस्तीचे कारणांमुळे पाणी पुरवठा खंडित होतो. याही परिस्थितीत सहनशील प्रामाणिक नगरकर गैरसोय असूनही नियमित पाणी पट्टी भरतात. त्याबदल्यात त्यांना नियमित पाणी देण्यातही मनपा प्रशासन अपयशी ठरत आहे. अशा वेळी पाणी पट्टी दरवाढ आवश्यक असली तरी त्याचे समर्थन करता येणार नाही. महानगरपालिकेने आधी नियमित व पुरेशा दाबाने सर्वांना समान पाणीवाटप होईल यादृष्टीने पाऊल उचलले पाहिजेत. समान पाणी आणि समान पाणीपट्टी हेच अपेक्षित आहे. मनपा हद्दीतील सर्व भागात समान आणि पुरेशा दाबाने पाणी पुरवठा केल्या नंतर मनपाने पाणी पट्टी दरवाढ टप्प्याटप्प्याने करावी. सध्या महानगरपालिकेत लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांचा आवाज प्रशासनासमोर मांडण्यात अडचणी आहेत. प्रशासनाने ही बाब लक्षात घेऊन आताच दरवाढ न करता भविष्यात येणाऱ्या जनप्रतिनिधींशी चर्चा करून सदर दरवाढीचा निर्णय घ्यावा असे आगरकर यांनी म्हटले आहे.

# पाणी पुरवठा योजनेच्या खर्चातील तूट भरून काढण्यासाठी घरगुती वापराच्या पाणीपट्टीत वाढ

## स्थायी समितीच्या मंजुरीनंतर प्रस्ताव महासभेकडे सादर, वाढत्या खर्चामुळे पाणीपट्टी वाढवणे गरजेचे : आयुक्त यशवंत डांगे

नगर – शहराच्या पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्थेवर होणाऱ्या खर्चात दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. दुसरीकडे गेल्या एकवीस वर्षांपासून पाणीपट्टी वाढवण्यात आलेली नाही. त्यामुळे पाणीपट्टीतून मिळणारे उत्पन्न व पाणी योजना व वितरण व्यवस्थेवर होणार खर्च यातील तफावत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, पाणी योजनेची वीज बिले देण्यात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. शहराची पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी महानगरपालिकेने घरगुती वापराच्या पाणीपट्टीच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

पाणीपुरवठा विभागाच्या प्रस्तावानुसार स्थायी समितीने घरगुती वापराच्या पाणीपट्टीत अर्धा इंच कनेक्शनसाठी ३०००, पाऊण इंच कनेक्शनसाठी ६००० व एक इंच कनेक्शनसाठी १० हजार रुपये दर निश्चित केला आहे. तसेच हद्दीबाहेरील मीटरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्यासाठी २० रुपये प्रतिहजार लिटर व शहरात मीटरद्वारे पाणी पुरवठ्यासाठी १० रुपये प्रति हजार लिटर दर निश्चित करून प्रस्ताव मंजूर केला आहे. हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेकडे पाठवण्यात आला आहे. यापूर्वी महानगरपालिकेने सन २००३ मध्ये पाणीपट्टीमध्ये वाढ केली होती. तेव्हापासून अर्धा इंच नळ कनेक्शनसाठी १५०० रुपये दर आकारला जात आहे. शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्था चालविण्याकरिता येणारा वीज बिल, दैनदिंन देखभाल व दुरुस्ती, आस्थापना खर्च यात मात्र कित्येक पटीने वाढ झाली आहे. शहरात घरगुती वापर नळ कनेक्शन धारकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने उत्पन्न वाढीच्या दृष्टिकोनातून प्रस्ताव दरवर्षी मंजुरीसाठी सादर करण्यात येत होते. मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नव्हता.

पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून महासभेने दिलेल्या मंजुरीनुसर घरगुती वापर पाणीपट्टी दरवाढ वगळता व्यावसायीक वापर, औद्योगिक वापर इत्यादी पाणी दरामध्ये यापूर्वीच दरवाढ लागू केलेली आहे. मात्र, त्यामुळे उत्पन्न वाढीत फारसा फरक पडलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करून सन २०२५–२०२६ पासून घरगुती पाणीपट्टीमध्ये दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या खर्चामुळे पाणीपट्टी वाढवणे गरजेचे असून नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# शिर्डी विमानतळ परिसरात लेझर किरण वापरास बंदी

## वैमानिकांच्या सुरक्षिततेसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांचे आदेश

शिर्डी – शिर्डी विमानतळाच्या २५ किलोमीटर परिघातील वायुक्षेत्रात प्रखर लेझर प्रकाश किरण आकाशात सोडण्यास बंदी घालण्याचे आदेश शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी जारी केले आहेत.

शिर्डी विमानतळ येथे दिवसा व रात्री वेगवेगळ्या विमान कंपन्यांची विमाने व हेलिकॉप्टर उतरत असतात आणि उड्डाण करीत असतात. रात्रीच्यावेळी वैमानिकांना दिशा आणि ठिकाण निश्चित करण्यासाठी धावपट्टीवर आणि हवाई वाहतूक नियत्रंण (एटीसी) टॉवरद्वारे लाईटचा उपयोग केला जातो. शिर्डी विमानतळ परिसरातील २५ किलोमीटर परिघात उच्च शक्तीच्या लेझरमुळे वैमानिकांचे लक्ष विचलित होणे आणि संभाव्य अक्षमतेमुळे विमानाच्या कार्यप्रणालीत गंभीर अडथळे येऊ शकतात.

सहज हाताळता येणाऱ्या (हँड हेल्ड लेझर) उपकरणाची कमी किंमत व बाजारातील सहज उपलब्धतेमुळे अशा घटनांची संख्या वाढून विमानाच्या महत्वाच्या टप्प्यामध्ये वैमानिक विचलीत होतात किंवा तात्पुरते अक्षम होतात. उड्डाण आणि लँडिंगच्या महत्वाच्या टप्प्यामध्ये अशा कृती विमानतळ परिसराच्या आसपास झाल्यास विमान वाहतुकीला अधिक धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा विमान वाहतूकीला अडथळा येऊ नये, कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश जारी करण्यात आले आहेत.

# मुकुंदनगरमध्ये नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यास पकडले

नगर – मुकुंदनगर येथील आयशा मस्जिदजवळ एका सुपर मार्केट व आइस्क्रीम पार्लरमध्ये नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यास भिंगार कॅम्प पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून नायलॉन मांजाच्या पाच रीळ जप्त करण्यात आल्या आहेत.

इरफान लालराजे शेख (वय ५७, रा. नवेद कॉम्प्लेक्स, मुकुंदनगर) याच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ जानेवारी रोजी सायंकाळी पोलिसांनी आयशा मस्जिदजवळील रझा सुपर मार्केट व आईस्क्रीम पार्लर परिसरात छापा टाकून कारवाई केली. पोहेकॉ रवींद्र टकले यांच्या फिर्यादीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस करत आहेत.

# सहकारी पतसंस्थांच्या कायद्यात मोठ्या प्रमाणावर बदल होणार

## मल्टिस्टेट संस्थांवर देखील राज्य सरकारचे लक्ष राहणार : वसंत लोढा



सहकारी पतसंस्थाच्या आढावा बैठकीमध्ये पतसंस्था फेडरेशनचे विभागीय अध्यक्ष वसंत लोढा यांचा सत्कार करताना आजीनाथ हजारे, दिलीप तिजोरे, भानुदास बोराटे, महेश जाधव, किशोर गांधी आदी.

नगर – पतसंस्था सहकार कायद्यात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत तसेच मल्टिस्टेट संस्थांवर देखील राज्य सरकारचे लक्ष राहणार आहे त्यामुळे पतसंस्थांची जबाबदारी वाढणार आहे, असे व्यक्तव्य पतसंस्था फेडरेशनचे विभागीय अध्यक्ष वसंत लोढा यांनी जामखेड येथील पतसंस्था चेअरमन व्यवस्थापक यांच्या आढावा बैठकीत केले.

पतसंस्थांचे आंतरराष्ट्रीय सहकार परिषद ९ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर १३ जानेवारी रोजी जामखेड येथील बोराटे कॉलेज हॉल येथे जामखेड तालुका सहकारी पतसंस्थाची आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी विभागाचे अध्यक्ष वसंत लोढा, जिल्हा फेडरेशन तथा तालुका फेडरेशनचे अध्यक्ष ज्योती क्रांती पतसंस्थेचे चेअरमन आजीनाथ हजारे, जामखेडचे सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे, राजश्री शाहू पतसंस्थेचे चेअरमन भानुदास बोराटे, विभागाचे अधिकारी महेश जाधव, किशोर गांधी यांनी केले.

यावेळी प्रास्ताविकात हजारे यांनी सांगितले की तालुक्यात तीस पतसंस्था आहेत पतसंस्था हा महत्त्वाचा घटक असुन समाजाच्या विविध घटकांना रोजगार देणारा घटक असतांना तरी देखील उपेक्षित राहिला आहे भविष्यात वाटचालीसाठी परिषदेला उपस्थित राहणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी बोलताना लोढा यांनी सांगितले की जगातील बेचाळीस देशात ही चळवळ उभी आहे त्यामुळे या आंतरराष्ट्रीय परिषदेला महत्त्व आहे या परिषदेला केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा तसेच राज्यातील सहकार मंत्री सहकार सचिव उपस्थित राहणार आहेत त्यामुळे उपस्थित राहावे, असे आवाहन केले. अहिल्यानगरने सहकारात देशाचे नेतृत्व करत आहे. त्यामुळे जिल्ह्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. सहकार चळवळीत एकच कायदा ठेवायचा आहे, यासाठी केंद्रीय मंत्री अमित शहा अनेकांशी चर्चा करत आहेत. राज्यातील बत्तीस जिल्ह्यात पतसंस्थांचे जाळे पसरले आहे पतसंस्थांनी अनेकदा चांगले वाईट दिवस पाहिले आहे तरी देखील ही चळवळ टिकून आहे यामध्ये जे घोटाळेबाज आहेत त्यांना शिक्षा झाली पाहिजे सध्या मल्टिस्टेटमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत. आता राज्यसरकारची परवानगी घ्यावी लागणार आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी जामखेडचे चेअरमन विनायक राऊत, संतोष निगुडे, ज्ञानेश्वर अंदुरे, मुन्ना शेख, बळीराम मेहर आदी सह पतसंस्थेचे संचालक, सचिव उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहरात विमानतळ मंजूर करा

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे मागणी



विचार भारतीच्यावतीने विमानतळ व विविध मागण्यांचे निवेदन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना सुधीर लांडगे, अशोक गायकवाड, कमलेश भंडारी व विशारद पेटकर.

नगर – अहिल्यानगर शहरात विमानतळ मंजूर करणे तसेच पुणे अहिल्यानगर इंटर सिटी रेल्वे व पुणे ते शिर्डी वंदे मातरम् एक्स्प्रेस ह्या दोन रेल्वे सुरू कराव्यात, महिला सक्षमीकरणाचे प्रतिक म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा पुतळा शहरात उभारवा. शहर विकासासाठी महत्वाच्या असलेल्या या कामांसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, या मागण्यांचे निवेदन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना विचार भारतीच्यावतीने सचिव सुधीर लांडगे, उपाध्यक्ष अशोक गायकवाड, अध्यक्ष कमलेश भंडारी व विशारद पेटकर यांनी दिले. यावेळी आ.संग्राम जगताप, आ.शिवाजी कर्डिले, माजी आमदार अरुण जगताप आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, विचार भारतीच्या वतीने २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत 'जन संवाद' उपक्रम राबवून समाजातील विविध क्षेत्रातील घटकांशी संवाद साधून पालकमंत्री राधाकृष्ण विखे व तत्कालीन खासदार सुजय विखे यांच्या सहकार्याने अहिल्यानगर शहर आणि जिल्ह्याचा एक विकास आराखडा तयार केला होता. या आराखड्यातील पुढील तीन प्रमुख मुद्यांसाठी केंद्रीयमंत्री म्हणून आपण पाठपुरावा करावा.

अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी शहरा जवळ विमानतळ होण्याची नागरिकांची खूप दिवसांची मागणी आहे. योगा योगाने विमानतळाच्या धावपट्टीसाठी येथील व्हीआरडीई ह्या केंद्रीय आस्थापनाची जागाही मोकळी झाली आहे. सदर जागेत एअर स्ट्रीप अस्तित्वात आहे. ह्या ठिकाणी जर विमानतळ विकसित झाले तर नगर शहरासह नाशिक, संभाजीनगर, संपूर्ण मराठवाडा आणि सूपा येथील उद्योग व्यवसायास चालना मिळेल.

अहिल्यानगर ते पुणे प्रवास करणारे हजारो प्रवासी आज रस्ता मार्गाचा उपयोग करत असल्याने त्यावर प्रचंड लोड सध्या आहे. जर पुणे नगर मार्गावर इंटर सिटी रेल्वे आणि पुणे शिर्डी वंदे मातरम् एक्स्प्रेस ह्या दोन रेल्वे सुरू झाल्या तर याचा खूप मोठा सकारात्मक परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होईल.

नुकतेच आमच्या शहराचे नामकरण अहिल्यानगर झाले आहे. ह्या जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जन्म झाला. या प्रेरणादायी व्यक्तित्वाचा स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या धर्तीवर महिला सबलीकरणाचे प्रतिक म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा पुतळा उभारण्यासाठी आपण प्रयत्न करावे अशी आमची विनंती आहे.

वरील तिन्ही कामांमुळे अहिल्यानगरीचा चेहरा मोहरा बदलेल आणि पुणे महानगर शहरावर येणारा ताण कमी होईल. ह्या विषयात आमदार संग्राम जगताप आणि मंत्री राधाकृष्ण विखे हे पूर्ण क्षमतेने प्रयत्नशील आहेतच. आपल्यासारख्या कार्यक्षम लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यानेही यात लक्ष घालावे.

# जिल्हा वाचनालयातर्फे राष्ट्रीय स्फूर्तीगीत स्पर्धा

नगर–जिल्हा वाचनालयाच्या वतीने सालाबाद प्रमाणे येत्या २६ जानेवारी भारतीय गणराज्य दिनानिमित्त राष्ट्रीय स्फूर्ती गीत गायनाची स्पर्धा आयोजित केली आहे.

२५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात या स्पर्धा होणार आहेत. इयत्ता पहिली ते चौथी व पाचवी ते दहावी अशा दोन गटात या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेच्या नंतर लगेचच विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देण्यात येतील.

अत्यंत जोशात होणाऱ्या या स्पर्धेत सर्वांनी सहभागी होऊन भारतीय प्रजासत्ताकदिनाचा आनंद साजरा करावा असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष प्राध्यापक शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्यक्ष अनंत देसाई, दिलीप पांढरे, खजिनदार तनवीर खान, सहकार्यवाह डॉक्टर राजा ठाकूर, सांस्कृतिक प्रतिनिधी किरण अग्रवाल, शिल्पा रसाळ व संचालक मंडळ यांनी केले आहे.

माहितीसाठी ग्रंथपाल अमोल इथापे ९५९५६६६७७०.

# मुकुंदनगरमध्ये गोमांस विक्री करणाऱ्यास पकडले

नगर – गोवंश जनावारांची कत्तल करून त्यांचे गोमांस, विक्री करणाऱ्या मांस विक्रेत्यावर भिंगार कॅम्प पोलिसांनी कारवाई करत ४५ किलो गोमांस जप्त केले. मुकुंदनगर भागातील बडी मरियम मशीद जवळ, अभिलेषा कॉलनीतील एका गाळ्यात १४ जानेवारीला ही कारवाई करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की मुकुंदनगर भागातील बडी मरियम मशीद जवळ, अभिलेषा कॉलनीतील गाळ्यात एक इसम गोवंश जनावरांचे गोमांस विक्री करत असल्याची माहिती भिंगार पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तेथे जावून छापा टाकत झिशान आयास कुरेशी (वय.३१, रा.सुभेदार गल्ली, बेपारी मोहल्ला) यास गोमांस विक्री करताना पकडले. त्याच्या ताब्यातून ९ हजार रुपये किमतीचे ४५ किलो गोमांस, एक चाकू व एक सत्तूर, एक तराजू व एक लोखंडी माप असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पो.कॉ.समीर शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात झिशान कुरेशी याच्या विरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २७१ सह महाराष्ट्र पशु संरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१५ चे कलम ५ (क), ९ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

